(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

<u>सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसणे</u>

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री महोदय उपस्थित नाहीत. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावरील चर्चेला सुरुवात होत असताना सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री महोदय उपस्थित असणे आवश्यक आहे.

तालिका सभापती : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटे तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.01 वाजता 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आली.)

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

सभागृहात मुंबई व उपनगर जिल्हयाचे पालकमंत्री उपस्थित राहण्यासंबंधी

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय,.....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आज नियम 260 अन्वये सत्तारुढ पक्षाकडून जो प्रस्ताव मांडण्यात येणार आहे त्या प्रस्तावातील विषय मुंबई शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असल्यामुळे पालकमंत्र्यांनी सभागृहात उपस्थित असणे अनिवार्य आहे. मुंबई शहर आणि उपनगराच्या जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत पालकमंत्री सांगली जिल्हयातून निवडून येत असले तरी आम्हाला एक-एक, दोन-दोन तास व्याख्यान देत असतात, आम्ही ते निमूटपणे ऐकून घेत असतो. उपनगर जिल्हयाचे पालकमंत्री श्री.नसीम खान हे त्याच्याही पुढे जाऊन विचार करतात. हा महत्वाचा विषय लक्षात घेता दोन्ही पालकमंत्र्यांनी सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे.

श्री.लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, मुंबई शहराचे पालकमंत्री यांनी दूरध्वनीवरुन मला कळविले आहे की, चैत्यभूमीच्या संदर्भात आढावा घेण्यासाठी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये ते व्यस्त आहेत.

श्रीमती विद्या चव्हाण :सभापती महोदय, सभागृहाचा वेळ वाया न घालविता मला प्रस्ताव मांडण्याची अनुमती द्यावी. गेले दोन दिवस सभागृहाचा वेळ अशाच प्रकारे वाया गेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मुंबई शहर आणि उपनगर जिल्हयासाठी स्वतंत्रपणे पालकमंत्री नेमलेले आहेत, त्यांना सभागृहात उपस्थित राहण्यास सांगावे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, पालकमंत्र्यांच्या उपस्थिती शिवाय चर्चा करण्याला काही अर्थ राहणार नाही.

तालिका सभापती : माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी प्रस्ताव मांडावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई, ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांची विविध समस्यांमुळे होत असलेली दुरवस्था

मु.शी.: मुंबई, ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांची विविध समस्यांमुळे होत असलेली दुरवस्था या विषयावर सर्वश्री किरण पावसकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, हेमंत टकले, जयप्रकाश छाजेड, प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, विक्रम काळे, निरंजन डावखरे, मुझफ्फर हुसेन, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री जयवंतराव जाधव, नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.रमेश शेंडगे, वि.प.स.यांचा प्रस्ताव

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प.नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडते :-

"देशाची आर्थिक राजधानी व सर्वात जास्त उत्पन्न असणारी मुंबई महानगरपालिका तसेच झपाट्याने शहरीकरण होत असलेली ठाणे महानगरपालिका व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांची विविध समस्यांमुळे होत असलेली दुरवस्था, याठिकाणी वाढत असलेल्या झोपडपट्टया व वाढत असलेली लोकसंख्या यामुळे तेथील नागरिकांना नागरी सुविधा न मिळणे, मुंबई महानगरपालिकेत रिक्त असलेले भूखंड विकासकांना देवून त्याठिकाणी टॉवर व मॉल उभे असणे, विकासकांबरोबर संगनमत करुन भूखंड विकासकांच्या ताब्यात देण्याचे सुरू असलेले प्रकार, यात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार होणे, झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत अनियमितता असून पात्र झोपडपट्टीधारकांना डावलून बनावट सभासद नोंदवून करण्यात येत असलेला प्रचंड भ्रष्टाचार, म्हाडाच्या संक्रमण शिबिरात सुरू असलेली घुसखोरी, नागरिकांना अत्यंत अपुरा पाणीपुरवठा होणे, यासाठी महिलांनी वेळोवेळी धरणे व आंदोलन करणे, बऱ्याच ठिकाणी अस्वच्छता असून जागोजागी कचऱ्यांचे ढीग असणे, मोठ्या प्रमाणात सुरु असलेली बेकायदेशीर बांधकामे, टपऱ्या भंगारवाल्यानी रस्त्यावर केलेले अतिक्रमण यामुळे नागरिकांना रस्त्यांवरुन चालणेही जिकिरीचे होणे, मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईप लाईन्स अत्यंत जीर्ण झाल्या असून पाईप लाईनच्या शेजारी मोठ्या प्रमाणात झोपडपट्टी वाढणे, या झोपडपट्टीत दहशतवादी लपून राहण्याची शक्यता, त्यामुळे सुरक्षेचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, रस्ते दुरुस्तीच्या कामात झालेला कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार, मुंबईत कोलमडून पडलेली वाहतूक व्यवस्था दिवसेंदिवस मालमोटारी व गाड्यांची वाढत

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.....

असलेली संख्या, वाहतुकीची होत असलेली कोंडी कमी करण्याची व वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याची आवश्यकता, मेट्रो रेल्वे व जलवाहतूक सुरू करण्याबाबत जनतेची होत असलेली मागणी, बऱ्याच ठिकाणी एमएमआरडीएची सुरू असलेली कामे संथगतीने सुरू असणे, या कामात बऱ्याच ठिकाणी झालेले अपघात, त्यात झालेली प्राणहानी, सांडपाण्याची व्यवस्था सुरळीत न ठेवल्याने दूषित पाण्यामुळे मुंबई शहरात डेंग्यू, मलेरिया रोगाची साथ मोठ्या प्रमाणात पसरणे, यात बऱ्याच लोकांचा झालेला मृत्यू, पावसाळ्यात ठिकठिकाणी पाणी तुंबून मुंबईतील जगजीवन ठप्प होणे, मुंबई, ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील बरीचशी नैसर्गिक तलाव व तळी बुजवून त्यावर अनधिकृत बांधकामे सुरू असणे, मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांची झालेली दुरवस्था, रुग्णांना औषधोपचार वेळीच न मिळणे, मुंबईतील फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात महापालिकेला आलेले अपयश, या समस्यांमुळे तेथील जनतेत निर्माण झालेली असंतोषाची भावना, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

नंतर सी.१...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहातील कामकाजाच्या घोषणेबाबत

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सदनात पहिल्यांदाच असे घडले आहे. पण ते का घडले, हे मला माहीत नाही. माननीय सभापती सभागृहाची बैठक स्थगित करतात, त्यावेळी जाहीर करतात की, आता सभागृहाची बैठक स्थगित होत आहे, सभागृहाची बैठक उद्या अमुक वेळी भरेल. परंतु, काल पहिल्यांदाच मला पहायला मिळाले की, माननीय सभापती सभागृहाची बैठक स्थगित करून जाता जाता परत आले आणि उद्या सकाळी अमुक प्रस्ताव घेतला जाईल, असे म्हणाले. सभागृहामध्ये अशा प्रकारची घोषणा पहिल्यांदाच झाली. सभागृहाची बैठक संपल्यानंतर पुन्हा येऊन उद्या काय होणार आहे, हे सांगण्यात आले. सभागृहात अशी प्रथा कधीच नव्हती. आपण नवीन पायंडा पाडला आहे. त्यामुळे नवीन पायंड्याप्रमाणे उद्या सुरूवातीला कोणते कामकाज घेण्यात येणार आहे, याची घोषणा रोजच्या रोज करावी, अशी माझी विनंती आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आताच काही वक्तव्य केले. काल माननीय सभापतींनी घोषणा केली, त्यावेळी सभागृहात गोंधळ सुरू होता. विरोधक गोंधळ करीत होते. त्यावेळी माननीय सभापती उठून सभागृहाची बैठक स्थगित केल्याची घोषणा वाचत होते. माननीय सभापतींनी परत येऊन घोषणा केलेली नाही. माझे पूर्ण लक्ष चेअरकडे होते. रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये, म्हणून मी हे सांगत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई, ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांची विविध समस्यांमुळे होत असलेली दुरवस्था

मु.शी.: मुंबई, ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांची विविध समस्यांमुळे होत असलेली दुरवस्था या विषयावर सर्वश्री किरण पावसकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, हेमंत टकले, जयप्रकाश छाजेड, प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, विक्रम काळे, निरंजन डावखरे, मुझफ्फर हुसेन, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री जयवंतराव जाधव, नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.रमेश शेंडगे, वि.प.स.यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरू ....

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करते की, मला प्रस्तावावर मत मांडू द्यावे. आपण ही चर्चा गांभीर्याने घ्यावी. मुंबई शहरे व उपनगरे मिळून महाराष्ट्राची लोकसंख्या 10-11 कोटी आहे. मुंबई, विरार, वसई, रायगड, नवी मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, भिवंडी या परिसराला मेट्रोपोलिटन सिटी म्हटले जाते. येथे अडीच कोटी लोक राहत आहेत. मुंबईची लोकसंख्या 1 कोटी 30 लाखांच्या वर गेली आहे. लोक रोजीरोटीसाठी मुंबईत येत आहेत. पूर्वी गिरण्या होत्या, उद्योगधंदे होते. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. आता राज्यातील अनेक गावांत दुष्काळ असल्यामुळेच नव्हे तर कायम मुंबई शहराकडे अनेक लोक रोजीरोटीसाठी येत असतात. त्यामुळे त्यांच्या निवाऱ्याची सोय गरजेची आहे. मुंबइत सर्वात गंभीर समस्या निवाऱ्याची आहे. मुंबईत राहण्याची सोय नसल्यामुळे लोकांना नाईलाजास्तव झोपडपट्टीमध्ये, चाळींमध्ये राहावे लागत आहे. निवाऱ्याची समस्या ही अनेक समस्यांमधील एक समस्या आहे. मी येथे सर्वच समस्यांवर बोलू शकणार नाही. परंतु, त्यातील काही प्रमुख समस्यांवर मला बोलायचे आहे. मुंबईत प्रमुख समस्या हाऊसिंगची आहे. शहरात मोठ्या प्रमाणात असलेल्या मध्यमवर्गाला घरे घेणे परवडणारे नाही. त्यामुळे लोकांना नाईलाजास्तव झोपडपट्ट्यांमध्ये राहावे लागत आहे.

सभापती महोदय, दुसरी महत्त्वाची समस्या वाहतुकीची आहे.

(नंतर श्री. भारवि ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ....

मुंबईतील लोकांना रेल्वे लोकल आणि बेस्ट बसने कामावर जावे लागते. त्यामुळे या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. त्याकडे ही शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे.

माझा तिसरा मुद्दा शौचालयासंबंधातील आहे. आज मुंबईमध्ये लोकसंख्येला पुरेल इतकी सार्वजनिक शौचालये नाहीत. आज मुंबईत शौचालयांचा तुटवडा आहे. मी मुंबई महानगरपालिकेची सदस्य असताना मला असे समजले होते की, 53 हजार शौचकूपांचा मुंबई शहरामध्ये तुटवडा आहे. 35 हजार शौचकूप बांधण्यासाठी मुंबई महानगरपालिकेकडे जी यंत्रणा पाहिजे ती नाही. सदर बाब वेळोवेळी निदर्शनास आणून सुद्धा मुंबई महापालिकेने त्यावर उपाययोजना केलेली नाही. एमएमआरडीने सांगितले होते की, हायवे वर दर 1 कि.मी.अंतरावर शौचालये बांधतो. 250 ते 300 सुलभ शौचालये बांधण्याची तयार एमएमआरडीने दाखविली असताना महापालिकेने सांगितले की, हा आमच्या कामामध्ये हस्तक्षेप आहे. आम्ही मुंबई शहरामध्ये अशा प्रकारचे टॉयलेट उपलब्ध करून देऊ. परंतु, मला सांगायला खेद वाटतो की, मुंबई महापालिकेने अजूनही शौचालये बांधलेली नाहीत. त्यांच्याकडे जो स्टाफ असायला हवा तो आज नाही. आम्हा प्रत्येक महापालिकेच्या सदस्याला मुंबई महानगरपालिकेने पत्र पाठविले होते की, आपल्या विभागातील एक जागा नक्की करावी तेथे आम्ही पंचतारांकित शौचालय बांधून देऊ. त्यांना जागा दाखविल्या नंतर सुद्धा मुंबई महानगरपालिकेने पंचतारांकित शौचालय तर सोडूनच द्यावे पण साधे सुलभ शौचालय देखील बांधलेले नाही. यात महापालिका कमी पडलेली आहे.

त्याच प्रमाणे मुंबईतील कचऱ्यासंबंधी 2-3 प्रश्न महत्त्वाचे प्रश्न आहेत. हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. कुठल्याही वस्ती जवळ डंपिंग ग्राऊंड असावे असे कोणालाही वाटत नाही. त्यामुळे कचऱ्याची समस्या मोठी आहे. कचरा उचलण्यासाठी वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामध्ये प्रचंड प्रमाणावर भ्रष्टाचार आहे. पावसाळा जवळ आला की, मुंबईत नालेसफाईची कामे हाती घेतली जातात. यासाठी 100 ते 200 कोटी रूपये मंजूर केलेले असताना देखील नालेसफाई व्यवस्थित होत नाही. 26 जुलै रोजी मुंबई पाण्याखाली बुडाली होती त्याला कारण नालेसफाई नीट न होणे व त्यामध्ये होत असलेला मोठ्या प्रमाणावरील भ्रष्टाचार हे होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ....

मुंबईतील आणखी एक समस्या आरोग्य केंद्रांची आहे. मुंबईतील प्रत्येक वॉर्डामध्ये एक आरोग्य केंद्र आहे. तेथे आपण चांगली सुविधा उपलब्ध करून दिली तर मुंबईतील के.इ.एम., सायन, भगवती, जे.जे., सेंट जॉर्जेस इत्यादी रूग्णालयांवर ताण येणार नाही. आज आपण या रूग्णालयांना भेट दिली तर येथे किती दुर्दशा आहे हे दिसून येईल. ही सर्व रूग्णालये नावाजलेली आहेत. येथे सर्वसामान्य माणसाला दाखल करून घेतल्यानंतर व्यवस्थित ट्रीटमेंट मिळत नाही. एवढेच नव्हे तर आज तेथे औषधांचा तुटवडा आहे. रूग्णाना पॅसेजमध्ये गाद्या टाकून ठेवण्यात येते. एवढी दुर्दशा आहे. आम्ही महापालिकेला वेळोवेळी सुचविले आहे की, 227 वॉर्डामध्ये आरोग्य केंद्रे आहेत ती सुस्थितीत आणणे आवश्यक आहे. आज मुंबईतील प्रत्येक वॉर्डातील लोकसंख्या 2 ते 4 लाखाच्या आसपास असून तेथे मुंबई महानगरपालिकेने आरोग्य केंद्रे सुरू केलेली नाहीत. तसेच अनेक ठिकाणची आरोग्य केंद्रे बंद आहेत.

आज मुंबईमधील रोगराईचे प्रमाण पहावे. मलेरिया, चिकन गुनिया, डेंग्यू, स्वाईन फ्ल्यू, इत्यादी आजार मुंबईतील नागरिकांना होत आहेत. या सर्व आजारांवर उपचार करण्यासाठी ब्लड टेस्ट करणे आवश्यक असते. त्यामुळे मी अशी सूचना केली होती की, प्रत्येक आरोग्य केंद्रांमध्ये पॅथॉलॉजी लॅब सुरू करावी. यासाठी मुंबई महानगरपालिकेला जास्त खर्च येणार नाही. आज मुंबई महानगरपालिकेचे बजेट 31 हजार कोटी रूपयांचे आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेने नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. त्यांनी प्रत्येक आरोग्य केंद्रामध्ये पॅथॉलॉजीची एक लॅब डॉक्टर व स्टाफ सह दिली तर लोकांची चांगली सोय होऊ शकेल. तसेच तेथे 20 बेड उपलब्ध करून दिले तर मुंबईतील गरीब रूग्ण जे महापालिकेच्या रूग्णालयांचा वापर करतात त्यांची तिथल्या तेथेच तपासणी होऊ शकेल. त्यामुळे केइएम, जे.जे.रूग्णालय इत्यादीवरील लोड कमी होईल. तिथल्या तेथेच लोकांना उपचार मिळू शकेल.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आज काय झाले की, ताप आल्यावर लोक दोन दिवस घरी रहातात आणि स्वत:च स्वत:वर उपचार करतात व ताप कमी होण्याची वाट पहातात. परंतु त्याला तिसऱ्या दिवशी हॉस्पिटलमध्ये जावे लागते. मुंबईमध्ये आजारी माणसाला जर के.ई.एम.हॉस्पिटलमध्ये जावयाचे असेल तर वाहतुकीचा त्रास सहन करावा लागतो. तसेच हॉस्पिटीलमध्ये गेल्यानंतर केस पेपर काढण्यासाठी लाईनमध्ये उभे रहावे लागते, पेशंटला लगेच ॲडमिट करुन घेतले जात नाही. तसेच त्या भागातील जे खाजगी डॉक्टर्स् आहेत, त्यातील बहुतेक बोगस आहेत. राज्यातील लोकांच्या आरोग्याची जबाबदारी महानगरपालिकेवर आले आणि जर त्यांनी मनात आणले तर महानगरपालिका लोकांना चांगली आरोग्य सेवा पुरवू शकते. परंतु महानगरपालिकेचे आरोग्य व्यवस्थेकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे आणि लोकांना आरोग्य सेवा पुरविण्याच्या बाबतीत ती असमर्थ ठरलेली आहे. त्यामुळे राज्यातील लोकांना आरोग्याची सेवा चांगल्या प्रकारे उपलब्ध करुन दिली पाहिजे असे माझे म्हणणे आहे.

सभापती महोदय, माझा दुसरा महत्वाचा मुद्दा महानगरपालिकेची गार्डन्स् आणि जी खेळाची मैदाने आहेत त्याबाबत असून मला त्याकडे सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे. आज मुलांना खेळण्या साठी मैदाने नाहीत. मुंबईमध्ये महापालिकेच्या अनेक शाळा मोक्याच्या ठिकाणी आहेत. परंतु त्यांची पूर्णपणे दुर्दशा झालेली आहे. मध्यंतरी महापालिकेतर्फे शाळेतील मुलांना जे सुगंधित दूध दिले जात होते, त्यामध्ये सुध्दा भेसळ आणि इतर गडबडी झालेल्या आहेत. या मुलांना सकस आहार व्यवस्थित दिला जात नाही. मुलांना शाळेचे मटेरिअल, स्कूल बॅग्ज वगैरे दिल्या जातात, त्याची क्वॉलिटी देखील चांगली नाही. तसेच महापालिकेच्या ज्या शाळांची दुर्दशा झालेली आहे, त्याठिकाणी टॉयलेटची सोय करणे, तेथे इतरही चांगली व्यवस्था करणे इ.कामांसाठी 2-2, 4-4 कोटी रुपये खर्च केला जातो. पण प्रत्यक्षात त्याठिकाणी दोन किंवा तीन लाख रुपयांचे काम देखील होत नाही अशी स्थिती आहे.

सभापती महोदय, मला सदनाचे या गोष्टीकडे लक्ष वेधावयाचे आहे की, शाळा आणि तेथे असलेली प्ले-ग्राऊंड आणि मुंबईच्या वस्त्यांमध्ये असलेली गार्डन्स् यांची देखील दुर्दशा झाली आहे. मुंबईमध्ये अनेक लोकांना सकाळी मॉर्निंग वॉक घ्यावयाचा असतो.पण आपण त्यासाठी कुठे जावे हा त्यांना प्रश्न पडतो.त्यामुळे मॉर्निंग वॉकच्या दृष्टीने आपल्याला अनेक उद्याने चांगल्या प्रकारे तयार करता येतीलह. आज एकही उद्यान सुस्थितीत नाही. पवई येथील आंबेडकर उद्यानासाठी अनेक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोटी रुपये खर्च केले. याबाबतीत सन्मानीय सदस्य श्री.आशिष शेलार नक्की आकडा सांगू शकतील. मला असे वाटते की, सदरहू कामासाठी 400 ते 500 कोटी रुपये मंजूर झाले होते. त्याचे कामही सुरु झाले. मात्र संबंधित विकासकाने तेथून पळ कापढला आणि तो पर त्याठिकाणी आला नाही. त्यामुळे सदरहू काम अनेक वर्षापासून अर्धवट स्थितीत आहे, त्याची दुर्दशा झाली आहे. अशा प्रकारे गार्डन्सच्या बाबतीत अनेक उदाहरणे देता येतील.

सभापती महोदय, या मुख्य विषयांकडे सदनाचे लक्ष वेधल्यानंतर मला मुंबईतील लोक ट्रेन बाबत सांगावयाचे आहे. मुंबईतील वाहतूक व्यवस्था अत्यंत वाईट परिस्थितीत आहे. त्या बाबतीत रेल्वेला जबाबदार धरले जाते. परंतु शासन याबाबतीत पूर्ण लक्ष देण्यास तयार नाही. या बाबतीत महाराष्ट्र शासनाचे लक्ष वेधले तर असे उत्तर दिले जाते की, रेल्वे आमच्या कार्यकक्षेमध्ये येत नाही. परंतु मला सांगावयाचे आहे की, दररोज दहा ते पंधरा माणसे लोकलच्या अपघातामध्ये मरण पावतात आणि अशा घटना आम्ही पाहिलेल्या आहेत. एखादा माणसू लोकल मधून पडल्यावर त्याचा हात-पाय तुटतो, अशा वेळी त्याला जखमी अवस्थेमध्ये स्टेचरवरुन हॉस्पिटलमध्ये नेण्यास कोणी तयार होत नाही अशी भयंकर दुर्दशा आहे. दरवर्षी मुंबईमध्ये साधारणपणे साडेचार ते पाच हजार माणसे लोकल ट्रेनम4ध्ये लोंबकळत असताना पडून मरण पावली आहेत आणि त्यामध्ये तरुण मुले देखील आहेत. यावर काहीजण म्हणतील की, गाडीमध्ये गर्दी असेल तर तुम्ही थांबले पाहिजे. नंतर दुसरी गाडी येईल, त्यातून प्रवास करावा. परंतु पाच-दहा मिनिटांनी गाड्या येत असतात. अशा वेळी आपण दहा गाड्या सोडून दिल्या तरी अकराव्या गाडीमध्ये देखील तेवढीच गर्दी असते. याकडे महाराष्ट्र शासनाने लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, लोकल ट्रेनच्या बाबतीत सांगावयाचे तर श्री.केतन गोराडिया हे इंजिनिअर आहेत. त्यांनी जेव्हा एक अपघात पाहिला तेव्हा त्यांनी लोकल ट्रेनच्या बाबतीत पूर्णपणे कॉन्सन्ट्रेशन केले. त्यांनी स्वत:चा व्यवसाय सोडून अनेक लोकांची मदत घेऊन ट्रेनच्या प्रोजेक्ट बाबत रिसर्च केला असून दोन वर्षापासून त्यांनी लोकलच्या बाबतीत एक चांगला प्लॅन तयार केलेला आहे. सदरहू प्लॅनबाबत आम्ही माननीय मुख्यमंत्री, रेल्वे बोर्ड यांच्याबरोबर बैठक घेतलेली आहे. शेवटी हा केंद्र शासनाचा प्रश्न असला तरी येथील जे लोक आहेत, मतदार आहेत त्यांचा अशा अपघातामध्ये मृत्यू होत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र शासनाची याबाबत जबाबदारी आहे आणि मुंबई ही आर्थिक राजधानी आहे.

अशुद्धीत प्रत / मुद्रणासाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

मुंबईतून 40 टक्के महसूल केंद्र सरकारला मिळतो. परंतु मुंबईतील लोकल रेल्वेकडे केंद्र शासन लक्ष देत नसेल आपण सिंगापूरच्या धर्तीवर रेल्वे प्रोजेक्ट करावा. सिंगापूर येथे प्रत्येक रेल्वे स्टेशनवर मॉल बांधलेले आहेत. या मॉलच्या माध्यमातून रेल्वेला निधी मिळेल. त्यातून नवीन लोकल सुरु करणे व लोकल रेल्वेचे अत्याधुनिकीकरण करणे शक्य होईल. या प्रकल्पासाठी पाच हजार कोटी रुपये खर्च आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी इलिव्हेटेड ट्रेन सुरु करण्यासाठी 57 हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे असे सांगितले. सेंट्रल रेल्वे मार्गासाठी 20 हजार कोटी रुपये, वेस्टर्न रेल्वे मार्गासाठी 20 हजार कोटी रुपये आणि हार्बर रेल्वेमार्गासाठी 17 हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

सभापती महोदय, अंधेरी-घाटकोपर या मेट्रो मार्गाचे काम मागील सात-आठ वर्षापासून सुरु आहे. अंधेरी पुलावरुन इलिव्हेटेड मेट्रो करण्यासाठी बराच कालावधी लागलेला आहे. चर्चगेट-भायखळा-लोअर परेल-दादर अशी इलिव्हेटेड ट्रेन जाणार आहे. लोकल ट्रेनच्या फेऱ्या बंद न करता हे काम करावयाचे झाले तर त्यासाठी 20-20 मीटर अंतरावर दोन ट्रॅकच्या मध्ये खांब टाकावे लागतील. परंतु हा प्रोजेक्ट पुढील 25 वर्षात पूर्ण होणार नाही. कारण अभियंत्यांनी अभ्यास केल्यानंतर ही माहिती दिलेली आहे.

सभापती महोदय, अगोदर सांगितल्याप्रमाणे जो प्रोजेक्ट केलेला आहे तो मस्जिद बंदर स्टेशन किंवा त्या पुढील स्टेशनपासून अंडरग्राऊंड असून तो ओव्हल मैदान येथून मुंबई सेंट्रल येथील रेल्वे वर्कशॉपच्या बाहेर पडणार आहे. हा 12-15 कि.मी.चा अंडरग्राऊंड रेल्वे मार्ग केल्यास आपणास लोकल व्यवस्थेमध्ये नावीन्यपूर्ण बदल करता येईल् आणि त्यासाठी खर्च देखील कमी आहे.

सभापती महोदय, मुंबईतील रेल्वे सिग्नल यंत्रणा बदलणे आवश्यक आहे. आताच्या लोकल ट्रेनमधून 70 ते 75 लाख लोक प्रवास करतात. आपण अंडरग्राऊंड रेल्वे केल्यास दीड करोड लोक प्रवास करु शकतील आणि आपणास सिग्नल सिस्टीम नव्याने करता येईल व आताची लोकल ट्रेन पाच मिनिटांच्या अंतराने धावते ती एक मिनिटाच्या अंतरावर आणता येईल. सिग्नल सिस्टीम

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

व कम्युनिकेशन बेस्ड कंट्रोल सिस्टीम बसविली तर लोकल रेल्वेमध्ये चांगली सुधारणा करता येईल. रेल्वे अधिकाऱ्यांना हा प्रोजेक्ट दाखविल्यानंतर त्यांनी तो नावाजला होता. आपण अशाप्रकारचा प्रोजेक्ट केल्यास तो दोन वर्षात पूर्ण होईल असे त्यांनी सांगितले होते. या प्रोजेक्टसाठी चार ते पाच हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. परंतु 57 हजार कोटी रुपयांचा प्रोजेक्ट मंजूर होत असेल तर आपला फायदा होऊ शकतो असे त्यांना वाटले. त्यांनी लोकांच्या फायद्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. मला आपल्यामार्फत शासनाला सांगावयाचे आहे की, आपण केंद्र शासनाच्या मदतीशिवाय हा प्रोजेक्ट चांगल्या प्रकारे करु शकतो. तेव्हा या बाबत विचार होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मला या निमित्ताने सांगावयाचे आहे की, माननीय मंत्री महोदयांकडून अनेकवेळा सांगण्यात येते की, रेल्वेचा विषय हा केंद्र शासनाशी संबंधित आहे. परंतु माननीय मंत्री महोदयांकडून अशी उत्तरे अपेक्षित नाहीत. आपणास जे काही चांगले काम करता येईल ते करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेचे 31 हजार कोटी रुपयांचे बजेट आहे. त्याच प्रमाणे केंद्र शासनाकडून जेएनएनयुआरएम अंतर्गत देखील मोठमोठ्या प्रोजेक्टसाठी निधी मिळत आहे. दिनांक 26 जुलै 2005 रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे मुंबईत सर्वत्र पाणी साचून हाहाकार उडाला होता. त्यावेळी मिठी नदीला पूर आला होता. मुंबई शहरात मिठी नदी अस्तित्वात आहे हे त्या दिवशी अनेकांना समजले. त्यापूर्वी आम्ही मच्छीमार चैत्यभूमी आंदोलन केले होते त्यावेळी एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी धारावीतून वाहणाऱ्या गटाराला मिठी नदी म्हटले होते.

यानंतर श्री.बोर्डे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ते गटार नसून मिठी नदी आहे. माहीम येथील कोळीवाड्यातील लोकांनी सांगितले की, मिठी नदीला गटार म्हणून नका. एमएमआरडीएमध्ये त्या वेळी श्री.झा नावाचे अधिकारी होते. त्या काळात बांध घालून मिठी नदीचे तोंड बंद करण्यात आले होते. आम्ही मच्छीमारांच्या मदतीने बांध तोडून त्या मिठी नदीच्या पाण्याचा फ्लो माहीम खाडीत सोडला. मुंबई महापुरात बुडल्यामुळे मिठी नदीची साफसफाई सुरु झाली आहे. मध्यंतरी मिठी नदीच्या साफसफाईचे काम सुरु झाले. त्या कामासाठी महापालिकेने केंद्र सरकारकडे 1400 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. गेल्या दोन-तीन वर्षापूर्वी त्यावर 900 कोटी रुपये केंद्र सरकारने खर्च केले. वास्तविक पाहता जेवढ्या प्रमाणात मिठी नदीची रुंदी वाढवावयास पाहिजे होती किंवा जेवढ्या प्रमाणात गाळ काढावयास पाहिजे होता तेवढ्या प्रमाणात तो काढला नाही. अनेकदा मिठी नदीतील गाळ काढून पुन्हा त्याच परिसरात टाकला जातो. त्यानंतर तो गाळ पुन्हा मिठी नदीत वाहून जातो व पुन्हा तोच गाळ उपसण्याचे काम केले जाते. अशा प्रकारचे अनेक गैरप्रकार त्या ठिकाणी सुरु आहेत.

महोदय, पवईच्या तलावाची कॅपॅसिटी आणि त्यामध्ये असणारे पाणी याचे नियंत्रण मिठी नदीच्या माध्यमातून करता येईल. पवई तलावातून ओसंडून जाणारे पाणी मिठी नदीत जाते. ते पाणी व्यवस्थित वापरले तर पवई तलावातील पाणी सुध्दा चांगल्या प्रकारे वापरता येईल.

महोदय, मुंबईतील फेरीवाल्यांची समस्या ही फार मोठी समस्या आहे. आज सरकारने फेरीवाल्यांना दुर्लक्षित केले आहे. महापालिका किंवा पोलिसांमार्फत फेरीवाल्यांवर कारवाई करुन त्यांना हाकलून दिले जाते. पूर्वी महापालिका पावती फाडून फेरीवाल्यांना फुटपाथवर बसू देत होती. परंतु आता पावती फाडणे सुध्दा बंद झाले आहे. ज्याप्रकारे 1995 पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण दिले आहे किंवा 2000 पर्यंतच्या झोपडपट्टयांना संरक्षण दिले जात आहे त्याच धर्तीवर फेरीवाल्यांच्या बाबतीत सुध्दा थोडा विचार करुन त्यांना रिलीफ दिला पाहिजे. जे बेरोजगार तरुण आहेत, ज्यांच्याकडे उपजीविकेचे साधन नाही किंवा गिरण्या बंद झाल्यामुळे ज्या गिरणी कामगारांनी फुटपाथवर व्यवसाय सुरु केला त्यांना काही तरी दिलासा दिला पाहिजे.

मी विलेपार्ले भागात राहते. त्या ठिकाणी फेरीवाल्यांची परिस्थिती फारच वाईट करुन टाकली आहे. कडक उन्हात त्यांना फळे, भाजीपाला, फुले, हार इ. वस्तू घेऊन फुटपाथवर बसावे लागते. महानगरपालिकेने त्यांना शेड उभारण्यास बंदी घातली आहे. त्यांना 7-8 तास भर उन्हात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

वस्तू विकण्यासाठी बसावे लागते. इतक्या कडक उन्हात त्यांचा भाजीपाला, फळे, फुले सुकून जातात. महोदय, इतक्या रखरखत्या उन्हात जेथे माणसे सुकून जातात तेथे फुला-फुलांची काय गोष्ट आहे ? या निमित्ताने माझी विनंती आहे की, महानगरपालिकेने फेरीवाल्यांकडे माणुसकीच्या दृष्टीने बघितले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब आपण ए.सी.मध्ये बसला आहात म्हणून आपल्याला बाहेरच्या उन्हाची जाणीव होत नाही. आपण फुटपाथवर जाऊन रखरखत्या उन्हात भाजी खरेदी करुन पहा. आम्ही या वस्तू खरेदी करतो म्हणून आम्हाला अनुभव आहे. असो.

महोदय, फेरीवाऱ्यांना 24 तास मेहनत करावी लागते. फेरीवाल्यांना उठविल्यामुळे महापालिकेचे अधिकारी आणि पोलीस वेगवेगळे हप्ते मागतात आणि फेरीवाले त्यांना हप्ते देतात. फेरीवाले ते हप्ते स्वत:च्या खिशातून देत नाहीत. परिणामी या लोकांच्या हप्त्याचा बोजा ग्राहकांवर पडतो. वाशीच्या बाजारामध्ये जी भाजी 8 रुपये किलो प्रमाणे मिळते तीच भाजी पार्ला, बांद्रा येथे 60 रुपये किलो प्रमाणे मिळते. पूर्वी महानगरपालिका ज्या वेळी पावत्या फाडत होत्या त्यावेळी ग्राहकांवर बोजा पडत नव्हता. त्या वेळी फेरीवाल्यांना महापालिकेचे संरक्षण होते. या निमित्ताने माझी मागणी आहे की, झोपडपट्ट्यातील लोकांना जसे संरक्षण दिले आहे तसेच संरक्षण फेरीवाल्यांना द्यावे. शिवाय 1995 पूर्वीच्या फेरीवाल्यांना शेड लावण्याची परवानगी दिली पाहिजे.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .....

जर तुम्हाला ते देता येत नसेल तर शासनाने आणि महानगरपालिकेने बेरोजगार तरुणांना नोकऱ्या द्याव्यात. आम्ही काहीच करणार नाही असे तुम्ही कसे सांगू शकता ? मग त्यांची चूल कशी पेटणार ? त्यामुळे याचा दोन्ही बाजूने विचार करुन शासनाने आणि महानगरपालिकेने मध्यम मार्ग काढला पाहिजे.

सभापती महोदय, अनेक लोक झोपडपट्टयांमध्ये राहतात. अनधिकृत बांधकामे होत आहेत. त्याला महानगरपालिकेचे ज्युनिअर इंजिनिअर्स जबाबदार आहेत. त्याला तेथील पोलीस जबाबदार आहेत. अनधिकृत बांधकामांना मटेरियल पुरवठा करणारी जी दुकाने सुरु आहेत त्या संदर्भात गेल्या तीन महिन्यांपासून मी सातत्याने तक्रार करीत आहे की, रस्त्यावरच मटेरियल पुरवठा करणाऱ्यांची जी दुकाने सुरु झालेली आहेत ती बंद करावीत. या संदर्भात वॉर्ड ऑफीसरकडे, आयुक्तांकडे तक्रारी केल्या. गेल्या दोन वर्षामध्ये, पाच सहा महिन्यांमध्ये जी अनधिकृत दुकाने उभी राहिली ती बंद करणार की नाही ? आज झोपडपट्ट्यांमधील लोकांना 5 रुपये हंडा या दराने पाणी विकत घ्यावे लागते. आज त्यांना कोणतीही गोष्ट फुकट मिळत नाही. विजेचे कनेक्शन जे अनधिकृत आहे ते सुध्दा त्यांना विकतच घ्यावे लागते.

सभापती महोदय, 1995 पूर्वीच्या झोपड्या आहेत. 65 लाख लोक झोपडपट्टयांमध्ये राहतात. त्यांचा हाऊसिंगचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने चांगल्या उपाययोजना केल्या पाहिजेत. आपण यूएलसी कायदा रद्द केलेला आहे. त्यातून आपल्याला अनेक जागा मिळू शकल्या असत्या. आपल्याकडे मिठागराच्या जमिनी आहेत. म्हाडासारखी यंत्रणा आपल्याकडे आहे. त्यांच्याकडे 600 इंजिनिअर्स आहेत. त्यांनी जर चांगल्या प्रकारची डेव्हलपमेंट केली तर ते काम होऊ शकते. आज झोपडपट्टयांसाठी एसआरए योजना आहे. पण त्यामध्ये बिल्डर, महानगरपालिकेचे अधिकारी आणि एसआरएचे अधिकारी यांचे नेक्सस सुरु झालेले आहे त्यामुळे त्या ठिकाणी झोपडपट्टीवासीयांना घरे न मिळता भलत्याच लोकांना घरे मिळतात. झोपडपट्टीतील रहिवाशांना अपात्र ठरवून हकलविण्यात येत आहे. नियम 33(5) प्रमाणे म्हाडाने डेव्हलपमेंट केली तर घरांचा प्रश्न सुटू शकेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .....

सभापती महोदय, महानगरपालिकेचे जे इस्टेट डिपार्टमेंट आहे त्यांनी महानगरपालिकेच्या ज्या प्रॉपर्टीज आहेत त्या सर्व विकण्याचा घाट घातलेला आहे. त्या ठिकाणी चाळींचा पुनर्विकास करुन चाळधारकांना चांगली घरे मिळण्याऐवजी त्या ठिकाणी मोठमोठे सेलेबल टॉवर उभे राहात आहेत. इस्टेट डिपार्टमेंटचा भ्रष्टाचार आम्ही अनेक वेळा बाहेर काढल्यानंतर सुध्दा त्यावर काही उपाययोजना होत नाही.

सभापती महोदय, आपण जर सागरी वाहतूक सुरु केली तर त्यातून वाहतुकीचा प्रश्न सुटू शकेल. सभापती महोदय, माझे अनेक मुद्दे बोलावयाचे राहून गेलेले आहेत तरी सुध्दा वेळेअभावी मी जे काही मुद्दे या ठिकाणी मांडलेले आहेत त्यावर शासनाने विचार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपविते.

प्रस्ताव प्रस्तुत झाला

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नगरसेवक पद गेल्यानंतर किती पश्चाताप होतो तसे भाषण मी आता ऐकत होतो. महानगरपालिकेचा नगरसेवक किती संवेदनशील असतो, प्रत्येक समस्येशी किती जोडलेला असतो हे यातून दिसून येते. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण नगरसेविका असताना जे प्रश्न सोडवित होत्या ते सर्व प्रश्न त्यांनी या ठिकाणी मांडले. मला बऱ्याच गोष्टींवर बोलावयाचे होते पण मी सर्व गोष्टी आज मांडणार नाही. आज माझ्यासमोर एक अत्यंत गंभीर मुद्दा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी मिठी नदी आणि त्या नदीला घातलेला बंधारा तसेच माहीमच्या कोळी समाजाचा विषय मांडला. सात बेटांची मिळून आताची मुंबई जेव्हा जन्माला आली तेव्हा तिकडचे मूळ ठिकाण माहीम होते. त्या मूळ माहीममध्ये सर्व कोळी समाज होता. शेकडो वर्षे हा समाज त्याच ठिकाणी राहात आहे. पिढ्या न पिढ्या ते त्याच ठिकाणी राहात आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

कालांतराने ते इमारतीमध्ये गेलेले आहेत. परंतु ते कोळी बांधव तेथेच आहेत. तेथे कोळ्यांची वस्ती आहे. शासनाने त्यांच्यासाठी एका बाजूला इमारती बांधल्या व पलीकडे समुद्राच्या बाजूला मासेमारीची जाळी वाळविण्यासाठी, मासे सुकविण्यासाठी मोकळी जागा दिलेली आहे. त्याचा अर्थ या समुद्रामध्ये मासेमारी करण्याचा त्यांचा अधिकार हा पिढ्यान्पिढ्याचा आहे. त्यावर अतिक्रमण होत आहे ते ताबडतोबीने शासनाने थांबविले पाहिजे. हा एक विषय घेऊन मी बोलत आहे.

माहीमच्या कोळीवाड्यातून 70 मोठ्या यांत्रिकी व 150 लहान यांत्रिकी बोटी मासेमारी करतात. मुंबईतील सर्व मंडयांमध्ये मासे विकण्यासाठी कोळी समाजासाठी जागा ठेवलेली असते. समुद्रामध्ये 20 कि.मी.पैकी पहिल्या 5 कि.मी.मध्ये मुंबई महानगरपालिका व राज्य सरकारची हद्द येते. त्या हद्दीमध्ये मासेमारीसाठी कोळ्यांना जाळी टाकावी लागतात. परंतु गेल्या महिन्यापासून कोळी बांधवांमध्ये तेथे संघर्ष उभा राहिलेला आहे. महाराष्ट्र शासन व संबंधित राज्याच्या मत्स्यव्यवसाय विभागाने परप्रांतीयांना मासेमारी करण्याची परवानगी दिलेली आहे.

सभापती महोदय, मासेमारी करीत असताना हिंदुस्थानमधील मच्छीमारांनी पाकिस्तानची हद्द ओलांडली की, त्यांना अटक करुन तुरुंगात टाकले जाते. तसेच पाकिस्तानच्या मच्छीमारांनी हिंदुस्थानची हद्द ओलांडल्यावर त्यांना अटक करुन तुरुंगात टाकले जाते. दोन्ही देशांनी तुरुंगातील 25-25 मच्छीमारांची सुटका केल्याचे अनेकदा आपण वर्तमानपत्रात वाचत असतो. निर्णय वरिष्ठ पातळीवरुन ही देवाणघेवाण होईपर्यंत हे सर्व मच्छीमार दोन्ही देशांच्या तुरुंगात असतात. मासेमारी करीत असताना चुकून एकमेकांची हद्द ओलांडली म्हणून त्यांना तुरुंगात राहावे लागते. मला याची कल्पना आहे की, हा दोन देशामधील व्यवहार आहे. परंतु आता परप्रांतातील मच्छीमार असले तरी ते भारतीय आहेत असे सांगण्याचा आगाऊपणा केला जाईल. त्यामुळे राज्यात हजारो वर्षे राहणाऱ्या मच्छीमारांच्या पिढीजात व्यवसायावर जर अतिक्रमण होणार असेल तर ती जबाबदारी शासनाची नाही काय ? घटनेतील कलमे सांगून परप्रांतीयांना राज्यात वाव देणार असाल आणि स्थानिकांचा उद्वेग निर्माण झाल्यानंतर परप्रांतीयांसाठी स्थानिकांना तुरुंगात टाकणार असाल तर आग लागो तुमच्या या मराठी राज्याला व राज्यकर्त्यांना असे दुर्दैवाने

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.दिवाकर रावते.....

बोलण्याची आमच्यावर पाळी आली आहे. भारतातील कोणात्याही नागरिकाला कोठेही जाण्याचा अधिकार आहे हे मान्य आहे. परंतु त्या घटनेने हेही निर्बंध घातलेले आहेत की, स्थानिकांचा उदरनिर्वाह उद्ध्वस्त करुन ते करता कामा नये. माहीमच्या संपूर्ण भागामध्ये परप्रांतीयांना नौकांचे परवाने दिल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या परवानगीने स्थानिक मच्छीमारांच्या जाळ्या फाटत असतील व त्यांच्या उद्योगावर घाव घातला जाणार असेल तर ते कदापि सहन केले जाणार नाही. मूळ मुंबईतील माहीम, परळ मूळ बेट होते. दादरही मूळचे नाही. परंतु या सात बेटांपैकी माहीम हे एक बेट होते. या मुंबईचे जे खरे मालक आहेत. त्यांच्या उद्योगधंद्याला उद्ध्वस्त करणार असाल तर संघर्ष कोणाशी करावयाचा व कशासाठी करावयाचा असा प्रश्न निर्माण होतो.

सभापती महोदय, राज्य शासनाने प्रथम ढोंगबाजी बंद करावी. माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरदराव पवार यांच्या सोबत एक घोषणा केली होती ती मी ऐकली आहे. कोळीवाड्यांच्या विकासाला सीआरझेडच्या कायद्यामुळे अडचण निर्माण झालेली आहे. त्या संदर्भात आम्ही केंद्र सरकारकडे जाऊ,.....

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि या कायद्यामध्ये अशी शिथिलता आणू की भविष्यामध्ये कोळीवाड्यातील स्थानिक समाजाला आपल्या जमिनीवर, घर बांधता येईल. ही घोषणा करुन पावणेदोन वर्षे झाली. कोळीवाड्यासाठी आदरणीय श्री. शरद पवार आणि सन्माननीय मुख्यमंत्री यांनी एका व्यासपीठावर येऊन मुंबईच्या मूळ मच्छीमार बांधवाकरिता, मूळ भूमिपुत्राकरिता सदिच्छा व्यक्ती केलेली आहे. घटनेच्या अनुच्छेदाचा आधार घेऊन परप्रांतीयांना तुम्ही दिलेले नौकांचे परवाने रद्द करणार काय हा माझा प्रश्न आहे.

श्री. भास्कर जाधव : मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या भाषणामध्ये व्यत्यय आणू इच्छित नाही. परंतु त्यांनी आता आदरणीय श्री. शरद पवार साहेब आणि माननीय मुख्यमंत्री महोदयांचा उल्लेख केला. दिनांक 26 फेब्रुवरी 2010 रोजी बीकेसी येथे पहिला राष्ट्रीय फिश फेस्टिव्हल झाला. त्या फेस्टिव्हलमध्ये श्री. शरद पवारसाहेब असे म्हणाले होते की वर्षानुवर्षे कोळी समाज, मच्छीमार समाज, दालदी समाज तेथे रहात आहे, ज्यांचे जीवन तेथे आहे, त्यांच्या अंगाखालच्या जमिनी तेथे आहेत, वहिवाटीखालच्या जमिनी तेथे आहेत त्या जमिनी त्यांच्या नावावर नाहीत. त्या जमिनी त्यांच्या नावावर व्हाव्यात असे त्यांनी सांगितले होते. या संदर्भात आम्ही पाठपुरवा केला. मी मुंबईतील आणि विशेषत: कोकणातील असल्यामुळे पाठपुरावा केला. 18 जून 2012ला या संदर्भात जी.आर. काढण्यात आला आणि त्यांच्या रहात्या घराखालील जमिनी त्यांच्या नावावर करण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्या निर्णयाची अंमलबजावणी मोठया प्रमाणावर रत्नागिरीमध्ये सुरु झाली. त्यानंतर ती अंमलबजावणी सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये सुरु केलेली आहे. मुंबईमध्ये ती अंमलबजावणी होत नसेल तर आम्ही जातीने त्यामध्ये लक्ष घालू.

श्री. दिवाकर रावते : आपण हा उल्लेख केला त्यामुळे मला बरे वाटले. ज्या राज्यकर्त्यांना कोळी बांधवाबद्दल, मुंबईच्या मूळ नागरिकांबद्दल आस्था आहे त्या आस्थेचा उल्लेख करुन मी आपणास विनंती केलेली आहे की, किमान पारंपरिक, पिढयान पिढया, शेकडो वर्षे या ठिकाणी राहिलेल्या स्थानिक बांधवांना हात लावतांना घटनेच्या कलमाचा दुसरा अर्थ लक्षात घेऊन तिकडच्या परप्रांतीयांना दिलेले परवाने तातडीने रद्द करावेत अशा प्रकारची मी विनंती करीत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

राज्यमंत्री महोदय श्री. भास्कर जाधव यांच्या पाठीमागे जर आदरणीय श्री. शरद पवार साहेब आणि सन्माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेब असतील तर हे शक्य आहे. म्हणून त्या संदर्भात आपण घोषणा केली तर कोळी बांधवांना फार मोठा आनंद होईल.

सभापती महोदय, मुंबई महापालिकेच्या भूखंडाच्या संदर्भातील दोन तज्ज्ञ या सभागृहामध्ये आहेत. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर हे जेथे राहातात तो भूखंड महापालिकेचा होता. त्या भूखंडाकरिता स्थानिक कायकर्ता म्हणून मी संघर्ष केला होता. तेथे ॲक्मे सोप कंपनी होती. त्या कंपनीमधून धूर येत होता आणि त्याबद्दल तेथील स्थानिक लोकांनी तक्रार केली होती. त्याकाळी श्री. मनाहेर जोशी हे नगरसेवक होते. त्यांचा एक कार्यकर्ता म्हणून ती ॲक्मेसोप कंपनी लोकांच्या तक्रारी येत असल्यामुळे मी बंद पाडली. ती जागा कोणत्या तरी दूध डेअरीला दिली. त्यानंतर एके दिवशी त्या ठिकाणी प्रचंड मोठा टॉवर उभा राहिला. त्या कारणमिमांसेमध्ये मला आता जायचे नाही. तो वेगळा विषय आहे. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर हे त्या ठिकाणी रहात आहेत. ते दादरचे झालेले आहेत. महानगरपालिकेची ती जागा कशी गेली हे मला कधीच समजले नाही. माझ्या शेजारचा 5 एकरचा उद्यानाचा भूखंड कसा गेला हे मला समजले नाही. सन्माननीय सदस्य किरण पावसकर आणि सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांना भूखंडाविषयी अधिक माहिती आहे. त्यामुळे ते त्यावर भाष्य करतील.

सभापती महोदय, कुर्ला या ठिकाणी भंगारवाल्यांनी बेकायदेशीर बांधकाम करुन अतिक्रमण केलेले आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी मिठी नदीचा उल्लेख केला. मिठी नदीवर फार मोठे काम झालेले असून देखील ही मिठी नदी कुर्ल्यामध्ये मुक्त होत नाही. काही ठिकाणी या मिठी नदीच्या आजूबाजूला उद्याने विकसित झाली. परंतु कुर्ल्यामध्ये जे भंगारवाले मिठी नदीमध्ये घुसलेले आहेत ते आजही महानगरपालिकेला किंवा सरकारला काढता का येत नाहीत याचे उत्तर मंत्री महोदय देतील काय ? याचे उत्तर एकच आहे की, मतांच्या लाचारीने ज्यांचे कौतुक या देशात केले जाते त्यांची ही भंगाराची दुकाने असल्यामुळे संपूर्ण मिठी नदी मुक्त झाली तरी कुर्ल्यामध्ये जे मिठी नदीमध्ये घुसलेले आहेत त्यांना का मुक्त केले जात नाही, त्यांना कधी मुक्त केले जाणार आहे याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे. या मिठी नदीवर 900 ते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

1400 कोटी रुपये खर्च करण्यात आलेले असले तरी कुर्ल्यामध्ये या भंगारवाल्यांनी मिठी नदीचा जो गळा आवळलेला आहे तो आपण कसा मुक्त करणार असा प्रश्न मी या ठिकाणी उपस्थित करीत आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, पाण्याच्या पाईपलाईनला लागून असलेल्या झोपडपट्टया हटविण्याचा निर्णय न्यायालयाने दिलेला आहे. त्या संदर्भात हालचाल का होत नाही? महापालिकेने या झोपड्या हलविण्याचा निर्णय घेतला असला तरी शासनाचा या निर्णयात मोठा वाटा असल्यामुळे वेळेवर पोलीस बळ उपलब्ध करुन दिले जात नाही. उच्च न्यायालयाचा निर्णय असतानाही काही लोकप्रतिनिधी या अतिक्रमणाच्या माध्यमातून उभ्या राहिलेल्या झोपडीधारकांचे पर्यायी जागेवर पुनर्वसन करावे म्हणून मागणी करीत आहेत. उपनगरीय रेल्वेच्या हद्दीमध्ये असलेल्या झोपड्यांचा राज्य शासनाशी काही संबंध नसताना देखील केंद्र स्तरावरुन आदेश आल्याबरोबर 1995 नंतरच्या रेल्वेच्या हद्दीतील झोपडीधारकांचे ताबडतोब पुनर्वसन करण्यात आले. मुंबईतील रस्त्यांच्या विस्तारामुळे विस्थापित झालेल्या लोकांसाठी शिवशाही सरकारच्या काळात 500 एकर जागेवर शिर्के कन्स्ट्रक्शन कंपनीकडून बांधण्यात आलेल्या घरांमध्ये या रेल्वेच्या हद्दीतील अतिक्रमित झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात आले. 1995 पूर्वीच्या झोपडीधारकांना जागा मिळत नाही. परंतु रेल्वेच्या हद्दीतील झोपड्यांपेक्षा पाण्याच्या पाईपलाईनला खेटून उभ्या राहिलेल्या झोपड्यांचा प्रश्न अधिक महत्वाचा आहे. त्या झोपड्यांचे पुनर्वसन करण्याच्या कामाला अग्रक्रम देण्यात यावा अशी मी विनंती करतो. तशी ठोस भूमिका शासनाने घेतली तर मुंबई महापालिकेला पुनर्वसन करणे सोपे जाईल.

सभापती महोदय, प्रस्तावामध्ये अनेक समस्यांचा उल्लेख केलेला असला तरी मला एका विषयाबाबतचा मुद्दा उपस्थित करणे महत्वाचे वाटते. या सभागृहात मुंबईतील फेरीवाल्यांच्या प्रश्नाबाबत चर्चा झाली होती. फेरीवाल्यांच्या संदर्भात शासनाने कायदा मंजूर केलेला आहे. सर्वोच्च न्यायालयाने फेरीवाला झोन तयार करावेत असा निर्णय दिला आहे.

सभापती महोदय, विलेपार्ले येथे फेरीवाल्यांच्या विरोधात स्थानिक नागरिकांनी आंदोलने केली. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना त्या आंदोलनात सहभागी व्हावे लागले. विलेपार्ले येथे फेरीवाल्यांनी मांडलेला उच्छाद लक्षात न घेता सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.ढोबळे यांची बदली करण्यात आली. त्यांनी काय पाप केले होते? फेरीवाल्यांचा उन्माद, फेरीवाल्यांचे मोर्चे, फेरीवाल्यांनी पोलिसांवर केलेली दगडफेक याची शासनाला माहिती नाही का? एका फेरीवाल्याचा मृत्यू झाला, तो श्री.ढोबळे यांनी मारहाण केल्यामुळे झालेला नव्हता हे आता सिध्द झाले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

पोलीस कारवाई करण्यासाठी आलेले पाहून धावपळ करीत असताना हृदयविकाराचा झटका येऊन त्या फेरीवाल्याचा मृत्यू झाला हे आता उघड झाले आहे. असे असताना फेरीवाल्यांची बाजू घेऊन श्री.ढोबळे यांच्यावर कारवाई करण्यात आली, त्यांची त्या विभागातून पोलीस नियंत्रण कक्षात बदली केली गेली. फेरीवाल्यांचे नेते सत्ताधारी पक्षात आहेत, त्यांना सांभाळण्यासाठी अशा प्रकारे चांगल्या अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार असेल तर यापुढे पोलीस या भानगडीत पडणार नाहीत. शासनाची इच्छा कशी असावी हे श्री.ढोबळे प्रकरणावरुन आपल्या लक्षात येईल. बेकायदेशीर लोकांना थारा द्यायचा आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्यांना बेसहारा करायचे ही शासनाची भूमिका योग्य नाही.

सभापती महोदय, मुंबई शहरातील कोळी बांधवांचा प्रश्न मी मांडला आहे. एसआरए योजनेबाबत स्वतंत्रपणे विषय मांडावा लागेल. त्या संदर्भात मी आता बोलू इच्छित नाही. मलेरिया, डेंग्यू यासारख्या आजारांवर नियंत्रण आणण्यास मुंबई महापालिका सक्षम आहे. उलट सरकारी रुग्णालये मुंबई महापालिकेकडे दिली जावीत अशा प्रकारे उत्तम दर्जाचे काम त्यांच्याकडून सुरु आहे. माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांच्या म्हणण्यात कितपत तथ्य आहे हे तपासून घ्यावे लागेल. मुंबईच्या कोळी समाजाचा विषय मांडण्यासाठी मी उभा होतो. सत्ताधारी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी त्यांचा आदर केला आहे. परप्रांतीय मच्छीमारांना जे परवाने दिले गेले आहेत त्या संदर्भात मंत्री महोदयांनी माहिती मागवून घ्यावी, त्यांचे परवाने रद्द झाले पाहिजेत एवढी माझी विनंती आहे.

श्री.भास्कर जाधव : लायसन्स दोन प्रकारची दिली गेली आहेत.

श्री.दिवाकर रावते : हे कोळी केरळचे आहेत, त्यांनी बेकायदेशीरपणे धारावी येथील पत्ते नमूद केलेले आहेत.

श्री.भास्कर जाधव : मत्स्य व्यवसाय विकास विभाग माझ्याकडेच आहे. त्या संदर्भात निर्णय घेतला जाईल.

श्री.भाई गिरकर : रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये सुध्दा केरळीयन मच्छीमारांना लायसन्स दिली आहेत.

नंतर एल.1...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपल्याला नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावरील चर्चा सकाळी 11.45 वाजता संपवायची आहे.

(सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मला आपल्या बोलण्याला सपोर्ट करून असे सांगावयाचे आहे की, नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा उत्तरासह सकाळी 11.45 वाजता संपवायची आहे.

तालिका सभापती : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी भाषणास सुरूवात करावी.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, मी नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर भाषण करण्यासाठी उभा आहे.

दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांना असे वाटत असेल की, नियम 260 अन्वये प्रस्ताव आणून आपण मुंबईवर चर्चा केली. आता अर्थसंकल्पातील काम 45 मिनिटांत होऊ शकेल. आपल्याला जनतेच्या प्रश्नावर बोलायचे असेल तर या प्रस्तावाच्या संदर्भात सविस्तर बोलले पाहिजे. मुंबईकडे महाराष्ट्राची राजधानी म्हणून बघू नका. ही देशाची आर्थिक राजधानी आहे. त्यामुळे हा प्रश्न देशाच्या पातळीवर चर्चेला घ्यावा लागेल. आपल्याला या प्रस्तावावर बोलण्यासाठी 45 मिनिटे नव्हे तर त्यापेक्षा जास्त वेळ दिला गेला पाहिजे. माझी आपणास विनंती आहे की, आपण अभ्यासू सन्माननीय सदस्यांना बोलू द्यावे आणि त्यासाठी पुढील दिवस लागला तरी द्यावा. मुंबईत अर्थसंकल्पीय व पावसाळी अशी 2 अधिवेशने होतात आणि तरी सुध्दा मुंबईच्या प्रश्नावर फक्त 2 तास बोलण्यास वेळ मिळणार असेल तर ते काही ठीक नाही. मुंबई महानगरपालिकेने मुंबईचे स्वरूप चांगले ठेवलेले नाही. मुंबई शहरात सर्व व्यवस्था चांगली असती, हे शहर बिजिंग सारखे, न्यूयॉर्क सारखे झाले असते तर कदाचित आम्हाला महानगरपालिकेचे आभार मानून जाता आले असते. महानगरपालिकावाल्यांनी काय घाण करून ठेवली आहे, त्याची चर्चा तरी आम्हाला करू द्यावी. त्यातील कचरा काढायला नको, पण यावर चर्चा करणे गरजेचे आहे. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य देखील सहमत होतील की, सदर प्रस्तावावरील चर्चेसाठी जास्त वेळ लागणार आहे.

महोदय, मुंबईत मोठ्या संख्येने लोंढे येत आहेत, टॉवर होत आहेत, मॉलची संख्या वाढत आहे. आपण चर्चेच्या अनुषंगाने शहरातील पाणीपुरवठा, आरोग्य यांच्या व्यवस्थेच्या संदर्भात भाष्य केले तर मुंबई शहरासंबंधी काही चर्चा केल्यासारखे होईल. मी मुद्दाम मुंबई शहराला देशाची आर्थिक राजधानी म्हटले की. आपण आणि आपला देश महासत्तेकडे जाण्याचा विचार करीत आहोत, त्या संदर्भातील गणिते मांडत आहोत.. आपण घोडागाडीमध्ये बसून महासत्तेची स्वप्ने पाहू शकत नाही. मला घोडागाडी मालकाची आठवण येते. घोडा पळावा म्हणून घोडागाडीचा मालक चाबकाने फटके मारीत होता. घोडागाडीच्या मालकाने घोड्याला भरपूर फटके मारल्यानंतर घोड्याच्या चामडीला कुठे छिद्रे पडली, हे तो पाहत होता. त्यावेळी प्रवासी कळवळून म्हणाला की,

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

घोड्याला एवढे मारू नको. घोड्याची चामडी खराब झाली तर चामडीचे पैसे येणार नाहीत. सध्या मुंबईची अवस्था हीच आहे. आपल्याला घोडा मेल्याचे दु:ख होत नाही. आपण त्याच्या चामडीचा पैसा येणार नाही, यावर बोलतो. आपण मुंबईच्या संदर्भात याच पातळीवर आलो आहोत.

मुंबईची लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे आपण त्यासाठी काय करणार आहोत, याचे नियोजन करण्याची गरज आहे. जगातील अनेक देशांतील शहरे पाहिली तर आपण त्यांच्याशी मुंबई शहराशी किती टक्के तुलना करू शकतो, हे समजत नाही. गेल्या 50 वर्षांमध्ये चीनने तेथील शहरांचा कायापालट केला, बिजिंग तयार केले, ते उद्योगधंद्यांत पुढे आले, त्यांनी इनफ्रास्ट्रक्चर दिले, हाँगकाँगने जागा कमी असताना एफएसआय जास्त देऊन त्यांची शहरे सुबक बनविली, न्यूयॉर्कने त्याचप्रमाणे सुंदर शहर केले. आपण या संदर्भात मुंबईसाठी बोललो तर कदाचित ते वावगे होणार नाही.

सभापती महोदय, जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा, सुरक्षित जीवन, शिक्षण व्यवस्था, स्वच्छता व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, पर्यावरणाचा समतोल, राजकीय-आर्थिक स्थिरता, सुरक्षित वाहतूक यावर मुंबई अवलंबून आहे. आपण 7 बेटांवर असलेल्या मुंबईमध्ये इतका भरणा करीत गेलो आहे की, मुंबईवर बोलताना आम्ही सुरूवात कोठून करावी, हेच कळत नाही. स्वच्छता ओला व सुका कचऱ्यापर्यंत मर्यादित राहिलेलो नाही. रि-डेव्हलपमेंट मधून निघणारे डेब्रिज नेऊन कुठे टाकायचे, त्याची विल्हेवाट कशी लावायची, हा एक प्रश्न आहे.

सभापती महोदय, जुन्या इमारती पाडताना, नवीन इमारत बांधताना निघणारे डेब्रिज कुठे नेऊन टाकणार ? तो कचरा फक्त 800 घन टन आणि 600 घन टन एवढ्यापर्यंत मोजणार का ? आपण त्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कोणती वेगळी व्यवसथा करणार आहात ? रि-डेव्हलपमेंटमधील कचरा निघाला की, तो कचरा सरकारी जागेवर नेऊन टाकायचा, नंतर सरकारी जागेवर असलेल्या कचऱ्याची साफसफाई करून तेथील दलालांनी नवीन वस्ती निर्माण करायची, तिला एसआरएचे स्वरूप द्यायचे आणि पुन्हा तेथे होणाऱ्या एसआरएला चांगले जीवन कसे देऊ शकतो, हे सांगायचे, असे हे सर्कल सुरू झाले आहे.

(नंतर श्री. भारवि ....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

टॅक्स भरणारे टॅक्स भरत असतात. बँका आणि सरकारी आस्थापनेवर काम करीत असलेले कर्मचारी आपला पगार इन्कम टॅक्स कापून घरी घेऊन जात असतात. त्यांना आपण मध्यमवर्गीय म्हणतो. हा मध्यमवर्गीय रस्त्यावर कपडे काढून ओरडू शकत नाही, दादागिरी करू शकत नाही आणि काळाबाजारही करू शकत नाही. म्हणजे मध्यमवर्गीयांनी टॅक्स भरायचा. उच्चभ्रूंनी टॅक्स कसा बुडवायचा यासाठी सल्लागार नेमायचे. कारण मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे आणि खालच्या वर्गाच्या लोकांनी पुन्हा ठरवायचे की, मी कुठेही झोपडी बांधली तरी मला पुन्हा घर हे मिळणार आहे. अशा प्रकारामध्ये मुंबई गुदमरत आहे. त्यासंबंधी नियोजन करणारे अधिकारी आपल्याकडे नाहीत काय ? त्या अधिकाऱ्यांचा आपण वापर करीत आहोत काय ?

मुंबई शहरावर दहशतवादी हल्ले झाले की आपण अधिकाऱ्यांची नावे घेतो. कायदा व सुव्यवस्थेवर बोललो की, आपण काही अधिकाऱ्यांची नावे घेतो. मग आपण म्हणतो की, श्री.रिबेरो साहेबांची काय कारकिर्द होती. त्यांची काय यंत्रणा होती. श्री.वाय.सी.पवार यांचे नाव आले की, आपण म्हणतो की, त्यांचे नेटवर्किंग चांगले होते. कारण मुंबई त्यांनी नियंत्रणामध्ये ठेवली होती. गुन्हा घडल्यानंतर क्राईम ब्रांच गुन्हेगाराला 12 तासामध्ये पकडून आणत होती. अशा प्रकारची यंत्रणा होती. आपण जेव्हा चर्चा करतो तेव्हा श्री.एम.एन.सिंग, श्री.रिबेरो, श्री.वाय.सी.पवार यांची नावे येतात. अशा प्रकारे आपण माजी सनदी अधिकाऱ्यांची नावे घेतो. त्यासंबंधी आपण अजूनही तेच गुणगाण गात आहोत. स्कॉटलंड यार्ड नंतर कोण तर मुंबई पोलीस असा उल्लेख केला जातो. एवढे मुंबई पोलिसांचे गुन्हेगारीवर नियंत्रण होते. मुंबईवर स्वत:चे नियंत्रण ठेवणारे अधिकारी होते, तेव्हा त्यांच्याकडे असलेले सर्व कॉन्स्टेबल शिंदे, कदम, जाधव या आडनावाचे होते. त्यांनी खऱ्या अर्थाने मुंबईवर नियंत्रण ठेवले होते. ही सर्व कोकणातून आलेली मंडळी होती. त्यांनी मुंबईच्या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविले होते. त्यामुळे मुंबईचे स्वरूप चांगले राहिले होते.

आज मला श्री.राकेश मारिया यांचे नाव घ्यावे लागेल. ज्या ज्या वेळी मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झाले त्या त्या वेळी त्या गुन्ह्याचा तपास 1993 पासून आज पर्यंत एकच अधिकारी करतो आहे. मग तो बॉम्बस्फोट कुठेही होवो. त्या तपासासाठी श्री.राकेश मारिया यांचे नाव पुढे येते. श्री.राकेश मारिया यांचे पथक शोध मोहीम हाती घेते. हे झाले गुन्हेगारी संबंधातील विश्लेषण.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

आपल्याला आरोग्य, वाहतूक, इत्यादी सर्व सुविधा चांगल्या प्रकारे उपलब्ध करून द्यायच्या असतील तर त्यासाठी आपल्याकडे चांगले अधिकारी नाहीत काय ? श्री.तिनईकर हे आयुक्त असताना त्यांची कारकिर्द चांगली गेली होती. डॉ.माधव गाडगीळ यांनी आताचा अहवाल दिला म्हणून बोलून चालणार नाही. पण त्यांनी देखील चांगली कामगिरी केली आहे. आताचे मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी श्री.कुंटे साहेब हे देखील चांगले काम करीत आहेत.

मी मागच्या वेळी सभागृहात बोललो होतो की, मुंबईचा आपल्याला आराखडा बनवायचा असेल तर त्यामध्ये श्री.देबाशिष चक्रवर्ती यांच्या सारख्या अधिकाऱ्याला घ्यावे. हे अधिकारी आपल्या कामाचा येथे ठसा उमटविल्या शिवाय राहणार नाहीत. आम्हाला अशा अधिकाऱ्यांची गरज या शहरासाठी आहे. या शहरातील सामान्य माणसाला चांगले जनजीवन द्यावयाचे असेल तर त्यासाठी नियोजन करावे लागेल. नियोजन करण्यासाठी सक्षम अधिकारी लागतील. त्यासाठी श्री.देबाशिष चक्रवर्ती यांच्या सारखे चांगले अधिकारी घेतले तरच काम होऊ शकेल.

येथे फक्त आरोप आणि प्रत्यारोप करून चालणार नाही. रेल्वे ही मुंबईची जीवनरेखा आहे. रेल्वे सेवा केंद्र सरकारच्या अखत्यारित आहे. या सेवेमध्ये काही सुधारणा करावयाची असेल तर राज्य सरकार किंवा मुंबई महानगरपालिका आपले म्हणणे त्यांच्या समोर मांडू शकते. मुंबई रेल्वे वाहतूक सेवा केंद्र सरकार तर्फे चालविण्यात येते. रिक्षा, टॅक्सी, प्रायव्हेट ट्रान्सपोर्ट हे राज्य सरकार पाहते.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर . . . .

सभापती महोदय, जर बी.ई.एस.टी.बसेस बद्दल बोलावयाचे झाले तर त्या महानगरपालिका चालविते म्हणजे केंद्र शासनाचा एक भाग आहे, राज्य शासनाचा एक भाग आहे आणि महानगरपालिकेचा एक भाग आहे. जोपर्यंत या शहरांच्या बाबतीत आपण एकत्रितपणे काही चर्चा करणार नाही तोपर्यंत यातून मार्ग निघणार नाही. रेल्वेच्या बाबतीत मार्ग निघू शकत नाही. रिक्षा, टॅक्सी, प्रायव्हेट ट्रान्सपोर्टच्या बाबतीत निघू शकत नाही, बी.ई.एस.टी.बाबत मार्ग निघू शकत नाही. त्यामुळे ट्रान्सपोर्ट बाबत सांगावयाचे झाले तर मी एवढेच सांगू शकेन की, ट्रान्सपोर्टच्या जागेबाबत जास्तीतजास्त खर्च करण्यापेक्षा ज्या सात बेटांची मिळून मुंबई बनलेली आहे, या सात बेटांच्या मुंबईला आणखी एक वाहतुकीचे स्वरुप देऊ शकतो आणि ते म्हणजे सागरी वाहतूक. माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि त्यांचे मंत्रिमंडळ हे सगळे त्यादिवशी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाची जागा पहावयास गेले होते. मी आज माननीय मंत्री महोदय, राज्य सरकारला विनंती करीन की, सागरी वाहतूक कशी सुरु करता येईल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. ज्या-ज्या शहरांचा विकास झाला आहे त्या सर्व ठिकाणी आजही सागरी वाहतूक चांगल्या प्रकारे सुरु आहे. दुबई, लंडन इ.ठिकाणी सागरी वाहतूक होते. तशा प्रकारच्या सागरी वाहतुकीसाठी जर आपण प्राधान्य दिले तर आपण काम करु शकतो आणि जास्तीतजास्त प्रश्न देखील सोडविता येण्यासारखे आहेत. आता वाहतुकीच्या बाबतीत बोलत असताना याठिकाणी असलेल्या खड्डयांच्या बाबतीत बोललो नाही तर आपण मुंबईवर अन्याय केल्यासारखेच होईल. कारण त्याची किंमत पाहिल्यानंतर समजते की, खड्डयाला काय किंमत दिली आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : 500 कोटी रुपये.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, कसले 500 कोटी? येथील रस्ते, खड्डे हा मुंबईकरांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. 2007 च्या महानगरपालिका निवडणुकीच्या वेळी जाहीर केलेल्या वचन नाम्यामध्ये दुसरे वचन होते की, पाच वर्षामध्ये रस्त्यांच्या कामावर साडेचार हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च झाला आणि काय खर्च केला हे देवाला माहिती. रस्त्यांच्या बाबतीत मी अनेक विषय मांडतो. रस्ते दुरुस्तीसाठी 687 कोटी 97 लाख रुपयांची तरतूद होती. 2008 मध्ये 1014 कोटी रुपये, 2009 मध्ये 160 कोटी आणि 2010 मध्ये 883 कोटी 30 लाख इतके आपण खर्च केले.

. . . .एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर . . . .

पण रस्त्यांची स्थिती काय आहे हे जनतेला माहिती आहे आणि दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांनाही याची कल्पना आहे. अशा वेळी मुंबईतील लोंढे थांबविण्यासाठी, चांगले जीवन उपलब्ध करुन देण्यासाठी आपण रस्त्यांची कशी वाट लावली आणि त्याला जबाबदार कोण आहे? पण केवळ त्यांच्यावर जबाबदारी ढकलून चालणार नाही.

सभापती महोदय, जेव्हा आपण जबाबदारी बाबत बोलतो तेव्हा एक प्रश्न नक्कीच उपस्थित होतो की, यासाठी आपल्याला एका पक्षाबद्दल बोलून चालणार नाही. कारण जर मुंबईचा विकास करावयाचा असेल तर त्यासाठी खऱ्या अर्थाने अभ्यास गटाची तरतूद करावी लागेल. एकाच्याच हातात दिले आणि तो कारभार करणार असे नाही. काही देशांमध्ये अशी पध्दत आहे की, महापौर निवडला जातो आणि तोच शहराचा कारभार पहातो. पण आपल्याकडे तशी परिस्थिती नाही. तसेच याबाबतीत एक इच्छाशक्ती असावयास पाहिजे. पण यासाठी केवळ राजकीय इच्छाशक्ती असून चालणार नाही तर यासाठी शहरी, नागरी, ग्रामीण जीवन सुलभ होण्यासाठी तसेच अनेक जटील प्रश्नांच्या बाबतीत तज्ज्ञ, सजग नागरिक असले पाहिजेत. या सर्व तज्ज्ञांना बरोबर घेऊन मार्ग काढावा लागेल.

सभापती महोदय, आपण वाहतुकीच्या बाबतीत मार्ग काढण्यासाठी काय केले आहे? आता पर्यंत आपण मार्ग काढण्याचा प्रयत्न केला आहे, त्यावेळी आम्ही स्वत:पुरता मार्ग काढण्याचा प्रयत्न केला.यामध्ये आरक्षित भूखंड असतील तर अशा वेळी आपण मार्ग काढतो.तसेच आराखडा, नकाशा तयार करतो.यासाठी तज्ज्ञ मंडळींना, शासकीय अधिकाऱ्यांनाही बरोबर घेतो.प्रशासकीय अधिकाऱ्यांनाही घेतो आणि त्यानंतर त्यातील भूखंड निवडतो आणि त्यानंतर काय झाले हे मला नावासह सांगता येईल.

सभापती महोदय, पालिकेमध्ये आरक्षित भूखंड लाटले याची बातमी आली होती. मुंबईचा पहिला विकास आराखडा 1976 साली तयार झाला. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, दुसरा आराखडा 1991 मध्ये प्रसिध्द झाला. या आराखड्यामध्ये शाळा, मनोरंजन, मैदाने, जागा, रस्ते, बगिचे अशा 35 बाबींसाठी भूखंडाचे आरक्षण करण्यात आले होते. त्याप्रमाणे सदरहू जागा संपादित करणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य होते. त्यापैकी किती जागा संपादित केली तर 62 पैकी 2 जागा आणि हा एक चर्चेचा विषय होऊ शकेल. मुंबईमध्ये सध्या 342 उद्याने, 337

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर . . . .

मनोरंजन मैदाने आहेत आणि 298 क्रीडांगणे आहेत. येथे मैदाने आहेत आणि लोकांना मैदानात मोकळा श्वास घेता यावा, मुलांना त्याठिकाणी खेळता यावे यासाठी आराखडे बनविण्यात आले.

सभापती महोदय, मघाशी याठिकाणी आराखड्यांची वर्ष सांगितली,मैदानांची संख्या सांगितली. पण जे महानगर पालिकेमध्ये राज्य करीत आहेत, त्यांच्या मधील नावे काढली तर प्रमुख मैदाने, प्रमख उद्याने यासाठी महापालिकेचे आरक्षित भूखंड सत्ताधाऱ्यांनी घेतले. मग त्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री.रवींद्र वायकर असतील, गोपाळ शेट्टी असतील, रमेश प्रभू असतील, विनोद घोसाळकर असतील इ.नावे मिळतात.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

हे सर्व सन्माननीय आमदार आहेत. यामध्ये काही नगरसेवक आहेत तर काही माजी नगरसेवक आहेत. मुंबईत मोकळा श्वास ठेवण्यासाठी मैदाने राखून ठेवण्यात आली होती तर ती मैदाने कुठे गेली ? या मैदानांवर क्लब बांधण्यात आले असून त्यामध्ये हॉल बांधण्यात आले आहेत. हे हॉल गरिबांसाठी बांधण्यात आले आहेत असे सांगण्यात येते. परंतु या हॉलचे भाडे दिवसाला 12 लाख रुपये आहे. कोणता गरीब माणूस या हॉलचे भाडे भरु शकेल ? मी या ठिकाणी जी भूखंडाची नावे सांगितली ते भूखंड कोठे आहेत ?

सभापती महोदय, तरुण पिढीला मैदानाअभावी गल्लीबोळात, रस्त्यावर खेळावे लागत आहे असे वचननाम्यामध्ये लिहिलेले आहे. तरुण मुलांना रस्त्यावर खेळावे लागत आहे तर मुंबईतील मोकळी मैदाने कुठे गेली, या मैदांनाचे काय केले ? केंद्र सरकारच्या आणि राज्य सरकारच्या मोकळ्या जागांवर डेब्रिज - कचरा टाकायचा आणि त्यानंतर त्यावर झोपडपट्टया वसवायच्या. आपण मुंबई शहराला जागतिक दर्जाचे शहर म्हणतो पण त्या शहराची अवस्था अशी वाईट झालेली आहे.

सभापती महोदय, आताच सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मुंबईतील महानगरपालिकेच्या रुग्णालयासंबंधी माहिती दिली. आज मुंबईत महानगरपालिकेची किती रुग्णालये आहेत ?

सभापती महोदय, शिक्षण नसलेले लोक जर या शहराच्या जास्तीत जास्त जागेच्या वापराचे नियोजन करणार असतील तर आपणास प्रशासनिक विस्तारीत आराखडे कशाला पाहिजेत ? रस्त्यावर तळलेले पदार्थ बनवू शकत नाही किंवा विकू शकत नाही असा नियम आहे. पण आपणच राजकीय लोक त्यांना वडापावची गाडी लावण्यास सांगत आहोत. ज्या पक्षाला 40-45 वर्षे झाली तरी ते आपल्या कार्यकर्त्यांना वडापावच्या गाड्या लावण्यास सांगणार आणि आपण मात्र भूखंड गिळंकृत करणार. नियमात बसत नसताना कार्यकर्त्याने वडापावची गाडी लावायची, एअरपोर्टच्या जागेवर शाळा बांधायची, नंतर जीव्हीकेला सांगायचे की, यावेळी झोपड्या तोडल्या की मला जागा दे, हा काय प्रकार आहे ? आपण अशा पध्दतीने मुंबई शहराचा विकास करणार आहात काय ? हा प्रकार भयानक आणि भयंकर आहे. या सर्व गोष्टींना महानगरपालिकेचे अधिकारी जबाबदार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

आहेत असे मी म्हणणार नाही, तर राज्य सरकारने देखील त्याकडे लक्ष दिलेले नाही. राज्य सरकारने कंट्रोल केले नसल्यामुळे हे प्रकार झालेले आहेत.

सभापती महोदय, आज मुंबईतील महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये 12 हजार लोकांमागे एक खाट आहे. तीन प्रमुख रुग्णांलयासह महानगरपालिकेची चार प्रमुख रुग्णालये आहेत. या व्यतिरिक्त 16 उपनगरीय रुग्णालये, 163 दवाखाने व 168 आरोग्य केंद्र असून आजच्या घडीला 10 हजार 169 खाटा उपलब्ध आहेत. 1968 मध्ये महानगरपालिकेतील रुग्णालयांमध्ये जेवढी खाटांची संख्या होती तेवढीच आजही आहे. त्यामध्ये आजही काहीही वाढ झालेली नाही. याला आपण विकास म्हणणार आहात काय ? 18-20 वर्षे एकाच पक्षाची सत्ता असताना रुग्णालयांमध्ये वाढ होऊ नये किंवा रुग्णालयांतील खाटांच्या संख्येत वाढ होऊ नये ही केवढी शोकांतिका आहे. सर्वच प्रकल्पांच्या बाबतीत हीच परिस्थिती आहे. 12 हजार लोकांमागे एक खाट आहे. (अडथळा)..

यांनतर श्री.बोर्डे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

महोदय, एखादे झाड कापण्यास गेलो तर महापालिकेचे अधिकारी लगेच कारवाई करण्यासाठी धावत येतात. कॅटरींग कॉलेजच्या रस्त्यासमोरील झाडामुळे असंख्य अपघात झाले. परंतु गेल्या 15 वर्षांत महापालिकेने ते झाड कापण्यासाठी कोठेही वादविवाद केले नाहीत महानगरपालिकेकडे ते झाड तोडण्यास परवानगी मागितली असता महापालिकेकडून सांगितले जाते की, हा विषय न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे ते झाड तोडू शकत नाही. महोदय, रस्त्याच्या मध्ये असलेले झाड तोडण्यासाठी आपण मार्ग काढू शकलो नाही, ही स्थिती आहे. आपण लंडन, चीन, न्यूयॉर्क देशाच्या किंवा शहराच्या गोष्टी करतो, त्यांच्याशी आपली तुलना करतो. परंतु त्याच वेळी एअरपोर्टच्या परिसरातील 70-80 वर्षांपूर्वीची 63 झाडे जीव्हीके कंपनीने पार्कींगसाठी कापली ? या बाबत मी विचारणा केली असता महापालिकेकडून सांगण्यात आले की, त्या झाडांच्या ऐवजी दुसरी झाडे लावण्यात येतील. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, आतापर्यंत गेल्या पाच वर्षात जीव्हीके कंपनीने किती झाडे लावली, ती झाडे कापण्यासाठी कोणी परवानगी दिली ? सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आपण मला बोलायला लावू नका. नाही तर 60 झाडे तोडण्यासाठी किती डिमांड केली गेली हे सुध्दा मी सांगेन आणि ते रेकॉर्डवर येईल. कुलाब्यातील 330 झाडे कापण्यासाठीचा प्रस्ताव महापालिकेकडे आल्याची बातमी टी.व्ही.वर दाखविली गेली. जर आपल्याला झाडेच तोडायची असतील तर वृक्षारोपण कशासाठी करणार आहात ? एक लाख झाडे लावणार आहोत अशी जाहिरात लावलेला ट्रक कॉलेजच्या परिसरात फिरविला जात आहे. मुंबई शहरातील 60-70 वर्षे जुनी झाडे कापत असताना त्या ठिकाणी छोटेसे रोपटे लावणार आहोत हे सांगताना तुम्हाला लाज वाटत नाही काय ? असे केल्याने मुंबईचे काय भले होणार आहे ?

महोदय, आज मुंबईत आरोग्याची स्थिती सुध्दा तीच आहे, शाळांची सुध्दा तीच स्थिती आहे. महापालिकेच्या शाळांच्या बाबतीत सांगायचे झाल्यास सर्व विद्यार्थी इंग्रजी शाळांकडे आकर्षित होत आहेत. त्यामुळे महापालिकेच्या मराठी शाळा ओस पडल्या आहेत. वास्तविक पाहता त्या शाळांमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर, स्टँडर्ड वाढवू शकतो, त्यांना चांगल्या वर्ग खोल्या देऊ शकतो. परंतु या गोष्टी न करता केवळ सुगंधी दूध कसे देता येईल आणि सुगंधी दुधाचा ठेका आपल्यालाच कसा मिळेल या साठीच आपण काम करणार आहात काय ? मुळात या सर्व गोष्टींना केंद्र सरकार, राज्य

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

सरकार जसे जबाबदार आहे, तशीच महानगरपालिका सुध्दा जबाबदार आहे. त्यामुळेच मुंबई महानगरपालिकेने केलेल्या खेळखंडोबाची चर्चा केली नाही तर मुंबई ही आणखी ओस पडेल, मुंबईत जगणे मुश्कील होईल.

महोदय, मध्यंतरी बातम्या आल्या होत्या. महापालिकेच्या कंत्राटदारांची लुटालूट, मुंबई महापालिकेतील सत्ताधाऱ्यांनीच नव्हे तर आता कंत्राटदारांनी सुध्दा महापालिका लुटायला घेतली आहे, मुंबईतील झोपडपट्टी सुधार, इमारत दुरुस्ती, रस्ते दुरुस्ती, शौचालये आदी कामांसाठी दिलेल्या कंत्राटात कमी रक्कम भरुन कंत्राटदाराने कामे मिळविली त्यातून कंत्राटदार कोट्यवधी रुपयांची माया जमवितात, सत्ताधाऱ्यांचे मात्र याकडे लक्षच नसल्याचे दिसून येत आहे. असे निरनिराळे प्रकार घडलेले आहेत. महोदय, माझ्याकडे 42 ठेकेदारांची यादी आहे. या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याबाबत मी वारंवार मागणी केली होती. या यादीमध्ये कोणाची किती टक्केवारी आहे हे सुध्दा नमूद आहे. उदा.सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांच्या कंपनीला काळ्या यादीत टाकल्यानंतर पुन्हा त्यांच्याच नाव बदललेल्या कंपनीला ठेका दिला जातो. मला माहीत आहे की, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांची कंपनी नाही, त्यांनी कोणतेही भूखंड लाटले नाहीत, जीव्हीके कंपनीच्या शाळांचे भूखंड लाटले नाहीत, त्यांनी टक्केवारी घेतली नाही. म्हणूनच मुंबईच्या समस्येवर जर आपण खऱ्या अर्थाने बोलणार असू तर महापालिकेच्या कामाचा विचार केला पाहिजे. महापालिकेत एखाद्या पक्षाची किंवा शिवसेना-भाजपाची सत्ता आहे म्हणून मी हे सांगत नाही. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, आपण काही अधिकाऱ्यांना कशाला कुरण खाण्यासाठी देता ? तुम्हाला 3-5 टक्के मिळतात म्हणून तुम्ही एवढे खायला देता, कशासाठी, काळ्या यादीतील ठेकेदारांची यादी देऊन सुध्दा त्यांनाच कशाला काम देता ?

आज मुंबईत आरोग्याची, रस्त्याची, मिठी नदीची वाईट अवस्था आहे. त्यामुळे या सर्व प्रश्नांवर आपल्याला मात करावी लागेल. जल बोगद्यांच्या बाबतीत वारंवार 'करुन दाखविले' असे सांगितले गेले. जल बोगद्यांच्या कामाची यादी माझ्याकडे आहे. ती यादी मी पटलावर ठेवू शकतो. मुंबईत 75 कि.मी. लांबीच्या जल वाहिन्या असल्याचे सांगितले जाते. मुळात त्या जल वाहिन्या ब्रिटिश काळापासूनच्या आहेत.

नंतर श्री.बरवड....

अशुद्धलिखित प्रत / शीघ्रमुद्रणासाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

तुम्ही काय करुन दाखविले त्याची सुध्दा यादी मी आपल्याकडे पाठवतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांना सांगू इच्छितो की, ज्या रस्त्यावरुन आम्ही येतो त्याच रस्त्यावरुन आपणही येता. या मुंबईची जर अशीच परिस्थिती राहिली तर आपल्याला वाहनाने विधान भवनापर्यंत पोहोचण्यासाठी आज जे दोन तास लागतात त्या ऐवजी चार पाच तास लागतील आणि याला खऱ्या अर्थाने आपण जबाबदार असणार आहात. म्हणून महानगरपालिकेमध्ये चालणाऱ्या भ्रष्टाचारावर तातडीने कारवाया झाल्या नाहीत तर या मुंबई शहराला दुसरे काहीही करता येणार नाही. आपल्याला जर जनसामान्यांचे जीवन चांगले ठेवावयाचे असेल तर त्यावर कठोर कारवाई करावी, अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : यानंतर सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार बोलतील. आपल्याला दहा मिनिटांचा वेळ दिलेला आहे.

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, आपण सर्वांना न्याय देण्यासाठी बसलेला आहात. जेवढा वेळ आपण सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण किंवा सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांना दिलेला आहे तेवढा वेळ आम्हाला द्याल अशी अपेक्षा आहे.

तालिका सभापती : आपल्याला 10 मिनिटांचा वेळ दिलेला आहे.

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आज ही चर्चा संपवू नये. ही चर्चा आपण पुढे चालू ठेवावी. आपण मला बोलण्यासाठी फक्त 10 मिनिटांचा वेळ देणार असाल तर मी बोलत नाही. आपण मला न्याय द्यावा.

तालिका सभापती : आपल्याला 15 मिनिटांचा वेळ देण्यात येईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, हा विषय राज्यात वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नासंबंधी आणि विशेषकरुन मुंबई आणि आजूबाजूच्या परिसरात निर्माण होणाऱ्या प्रश्नांच्या संदर्भात आहे. या प्रस्तावावरील चर्चेमध्ये दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना आपली भूमिका मांडावयाची आहे. त्यामुळे आपण या प्रस्तावावरील चर्चेसाठी पुरेसा वेळ द्यावा, जितकी चर्चा होईल तितकी होऊ द्यावी. पुन्हा या प्रस्तावावरील चर्चेसाठी निश्चितपणे एक सत्र आपण द्यावे अशी विनंती करतो.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. मला एक गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. या प्रस्तावावरील चर्चा आता संपणार नाही. ही चर्चा पुढे चालू राहणार आहे. आणखी एका सत्रामध्ये या प्रस्तावावर चर्चा व्हावी याबद्दल माझी हरकत असण्याचे कारण नाही. पण साधारणपणे चर्चेच्या संदर्भात अशी प्रथा आहे की, कोणत्याही विषयाची चर्चा सुरु करताना सत्ताधारी पक्षाचा किंवा विरोधी पक्षाचा जो कोणी प्रमुख सदस्य प्रस्ताव मांडत असतो त्याला बोलण्यासाठी जास्त वेळ दिला जातो. मी सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांच्या बाबतीत बोलत नाही. मी सभागृहाच्या संदर्भात बोलत आहे. प्रस्ताव मांडणाऱ्या प्रमुख सदस्यानंतर बोलणाऱ्या सर्व वक्त्यांना जर आपण तेवढाच वेळ देत गेलो तर चर्चेला कालमर्यादा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

राहात नाही. म्हणून कोणत्याही प्रस्तावावरील चर्चा जी कालमर्यादा ठरवून केली जाते त्यातील निम्मा वेळ सत्ताधारी पक्षाला आणि निम्मा वेळ विरोधी पक्षाला दिला जातो. सत्ताधारी पक्षाला मंत्र्यांच्या उत्तरासह निम्मा वेळ दिलेला असतो. जर या चर्चेचा दर्जा टिकवावयाचा असेल तर या प्रस्तावावरील चर्चा दुसऱ्या सत्रामध्ये तरी पूर्ण व्हावी अशा पध्दतीने नियोजन व्हावे अशी माझी विनंती आहे.

तालिका सभापती : ठीक आहे. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी आपले भाषण सुरु करावे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर व इतर सर्व सहकाऱ्यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी प्रथम या चर्चेला सुरुवात केली आहे. या सदनामध्ये या विषयावर विस्तृतपणे चर्चा होणे अपेक्षित आहे. त्या भावनेतून सर्व सन्माननीय सदस्य आपली मते मांडत आहेत. सदर प्रस्तावामध्ये अनेक महत्वाचे विषय मांडण्यात आलेले आहेत. त्याचे वर्गीकरण केले तर या प्रस्तावातील विषय वेगवेगळ्या ॲथोरिटींशी संबंधित आहेत असे दिसते. या प्रस्तावात शहरांचा विषय असल्यामुळे मुंबई, ठाणे व एमएमआरडीएच्या क्षेत्रातील सर्व शहरांचा संबंध येतो. दुसरे असे की, एमएमआरडीए, मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, एसआरए, रेल्वे, या 5 ॲथोरिटींशी संबंधित हा प्रस्ताव आहे. या राज्यात झपाट्याने शहरीकरण वाढत आहे असा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावात केलेला आहे. त्यावर विचार केला असता असे लक्षात येते की, राज्यामध्ये 48 टक्के शहरीकरण झालेले आहे. त्यामुळे या राज्याकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे असे सन्माननीय सदस्यांना अभिप्रेत आहे. राज्यात सर्वात जास्त शहरीकरण मुंबईत झालेले आहे. त्यामुळे या मुंबई शहरातील समस्यांबद्दल येथे चर्चा होत आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माझ्या तरुण मित्रांच्या लक्षात मी आणून देऊ इच्छितो की, 2001 नंतर 2011 मधील लोकसंख्येची तुलनात्मक आकडेवारी पाहिली तर फक्त 4 टक्के लोकसंख्या मुंबईत वाढलेली आहे. सर्वात जास्त लोकसंख्या पिंपरी-चिंचवड शहरात वाढलेली आहे. त्यानंतर पुणे शहराचा नंबर लागतो.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, मी लोकसंख्येबद्दल बोलत नव्हतो. मी नागरीकरणाबद्दल बोलत आहे. सन्माननीय नगरविकास राज्यमंत्री हे अभ्यासू आहेत. त्यामुळे ते या चर्चेला नगरविकास मंत्री म्हणून उत्तर देतील, राष्ट्रवादी पक्षाचे नेते म्हणून उत्तर देणार नाहीत अशी आमची अपेक्षा आहे. 1951 मध्ये या मुंबई शहराची वाढ 66 टक्के झाली. 1971 मध्ये 43 टक्के, 1981 मध्ये 38 टक्के आणि आता केवळ 4 टक्के वाढ झाली आहे. याचे कारण असे आहे

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

ॲड.आशिष शेलार.....

की, मुंबई शहराच्या विकासाबरोबर देशातील अन्य राज्यांचा विकास होऊ लागला आणि तेथून येणारी लोकसंख्या कमी होऊ लागली. त्याचे श्रेय एनडीएकडे जाते. कारण बिहार, उत्तर प्रदेश, गुजरात या राज्यांमध्ये विकास होत आहे. कर्नाटक राज्यातून मुंबईत कमी लोक येतात. त्यामुळे लोकसंख्या व नागरीकरणाबाबत श्रेय एनडीएला द्यावे लागेल हे माननीय राज्यमंत्री नाकारु शकणार नाहीत.

सभापती महोदय, ही अतिशय महत्वाची चर्चा असल्यामुळे मी केवळ 5 ॲथोरिटींपुरते माझे विचार मांडणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर आणि सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी चर्चेच्या ओघात काही आरोप केलेले आहेत. त्या संदर्भात मला मंत्री महोदयांकडून उत्तर अपेक्षित आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी सुरुवातीला अकॅडेमिक चर्चेला सुरुवात केली होती. त्यांनी मुंबई शहरातील समस्या मांडत असताना राज्य सरकारच्या, केंद्र सरकारच्या रेल्वे खात्याच्या अडचणींचा मुद्दा मांडला आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी आपल्या भाषणात राजकारण आणण्याचा प्रयत्न केला आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार...

त्यांनी तसा प्रयत्न केल्यामुळे त्यांच्या मुद्यांना मी प्रथम उत्तर देतो आणि त्यानंतर ॲकेडेमिक चर्चेकडे वळतो.

या ठिकाणी भूखंड आणि आरक्षणाचा विषय काढण्यात आला. त्यांनी विचारले की, ज्या पध्दतीचे आरक्षण ॲक्वायर करायला पाहिजे त्याचे काय झाले, ॲक्विझिशन झाले काय ? मुंबई शहरातील वेगवेगळया आरक्षित भूखंडांचे ॲक्विझिशन झालेले आहे. हा विषय नगरविकास खात्याचा आहे. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून महानगरपालिकेचे या संदर्भात निश्चितच कर्तव्य आहे. नगर विकास खात्याकडून 37(1), 37(1)(A) आणि या नियमाखाली किती नोटीसा देण्यात आल्या ? 2005 मध्ये मी इम्प्रूव्हमेंट कमिटीचा चेअरमन होतो. तेव्हा पासून 2011 पर्यंत 172 नोटीसा देण्यात आल्या. नगर विकास खात्याने दिलेल्या नोटीसांच्या आधारे 116 भूखंडांचे आरक्षण बदलण्यात आले. त्यापैकी जवळ जवळ 60 भूखंड हे 37(1)(A) Where public purpose and urgencies to move important things.. पब्लिक परपज आणि अर्जन्सीमध्ये तेथील स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे मुंबई महानगरपालिका यांचे मतही घेणे जरुरीचे नाही अशा पध्दतीने रिझर्व्हेशन बदलण्यात आले.

या ठिकाणी फक्त तिघांची भूखंड वाटपाची यादी वाचण्यात आली. ज्यांनी भूखंड घेतले त्यांची मी वकिली करणार नाही. कारण आरजी पीजीची पॉलिसी अजूनही नगरविकास खात्याकडे प्रलंबित आहे. मुंबईकरांना सुविधा देण्यासाठी आरजी पीजीचे भूखंड कसे दिले पाहिजेत या संबंधीचा निर्णय प्रलंबित आहे. त्या फाईलवर कोण बसलेले आहे याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे. भूखंड वाटपाची यादी वाचायची झाली तर मला हे नमूद करावे लागेल की, खार पश्चिमेला मांजरा एज्युकेशन ट्रस्टला भूखंड देण्यात आला. याच्याशी संबंधित असलेल्या नेत्याचे नाव घेणे योग्य होणार नाही. या भूखंडासंबंधी कोणता निर्णय झाला ? मुंबई महानगरपालिकेचा बांद्रा पश्चिम येथे शालेय शिक्षणासाठी आरक्षित असलेला भूखंड एमईटीला कधी देण्यात आला ? हा भूखंड कोणाला देण्यात आला त्याचे मी नाव घेणार नाही. शालेय शिक्षणासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर काय चालते, तेथे कोणत्या पक्षाच्या मिटींग होतात याचा मी येथे उल्लेख करणार नाही.

सभापती महोदय, मी या ठिकाणी केन्द्रीय नेत्याचे नाव घेणार नाही. ते बांद्र्यामध्ये राहातात. ते केन्द्रातील गृह खाते सांभाळत आहेत. बांद्रा पूर्व या ठिकाणी बीकेसीला लागून

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार....

असलेला आणि शालेय शिक्षणाकरिता आरक्षित असलेला भूखंड हा ज्या केन्द्रीय मंत्र्याच्या संस्थेला देण्यात आला त्यांचे मी नाव येणार नाही. त्यांच्या बाजूला लागून असलेला आणि इंटर नॅशनल स्कूल बनविण्यासाठी आरक्षित असलेला भूखंड कोणत्या पालकमंत्र्यांनी घेतला त्यांचे नाव सांगण्याची आवश्यकता नाही. त्याही पलीकडे जाऊन मी सांगू इच्छितो की, कांदिवली येथील रिक्रिएशन ग्राऊंडसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर एक क्लब होणार आहे. त्या क्लबसाठी परवानगी दिलेली आहे. हा भूखंड 37(1) खाली दिलाच पाहिजे असे कोणत्या केन्द्रीय नेत्याने सांगितले त्यांचे नाव मी सांगणार नाही. त्या ठिकाणी एमसीएचा क्लब उभा रहाणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे.

आपल्याच नेत्यांनी घेतलेल्या भूमिकेवर तुमच्या बरोबर सत्तेत बसलेल्या एका पक्षाच्या नेत्यांनी महानगरपालिकेमध्ये सांगितले की, तुमच्या केन्द्रीय नेत्याला एमपीडीए लावा. ही आमची मागणी नव्हती. ज्यांच्या बरोबर तुम्ही सत्तेत वाटेकरी झाला आहात त्याच्यांच नेत्यांनी सांगितले की, केन्द्रीय नेत्याला क्लब बांधायला परवानगी दिली म्हणून एमपीडीऐ लावा. ही मागणी आमची नव्हती. (अडथळा) 161 भूखंडाचे आरक्षण बदलण्यात आले. मी वानगी दाखल उदाहरण देतो. अंधेरी येथील ट्राफिकसाठी असलेला भूखंडा एसआरए स्कीमसाठी कोणत्या मंत्र्यांनी दिला त्यांचे मी नांव सांगणार नाही.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाही नाही

SGB/ KTG/ पूर्वी श्री.शिगम... 11:40

ॲड.आशिष शेलार.....

सभापती महोदय, आघाडी सरकारने चेंबूर येथील कोणते आरक्षण बदलले? भिक्षेकरी गृहासाठी असलेले आरक्षण बदलले. भिक्षेकरांच्या पुनर्वसनासाठी असलेले आरक्षण नियम 37(1)(ए) खाली बदलले. या भयंकर प्रकाराचे उत्तर मंत्री महोदयांनी सभागृहाला दिले पाहिजे.

सभापती महोदय, एक अधिसूचना चार वर्षापूर्वी अशी काढण्यात आली की, दहिसर येथे नो डेव्हलपमेंट झोनमध्ये असलेली जागा, त्या जागेवर सुरुवातीला कचऱ्यावरील प्रोसेसिंग प्लँट म्हणून इंडस्ट्री करावी असे आरक्षण निश्चित करण्यात आले. कालांतराने ते आरक्षण बदलण्यात आले. इंडस्ट्रीचे आरक्षण आल्यानंतर ते 'निवासी' या वर्गामध्ये बदलण्यात आले. या भूखंडावरील आरक्षण बदलल्यानंतर येणारी योजना कोणत्या मंत्र्यांची आहे त्यांचे नाव मी या ठिकाणी सांगणार नाही. त्यामुळे भूखंड, मोकळ्या जागा यांचे आरक्षण बदलणे ही कोणत्या एका महापालिकेची जबाबदारी नाही. माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांचे म्हणणे असे असेल तर त्यांच्याच पक्षाच्या नेत्याला एमपीडीए लागू करा अशी मागणी त्यांच्याच बाजूला बसणाऱ्या पक्षाच्या नेत्यांकडून करण्यात आली याबद्दल चिंता करण्याची गरज आहे. माझी तशी मागणी नव्हती आणि आजही नाही. परंतु मुंबई महापालिकेचा गळा घोटण्याचे काम केवळ आणि केवळ नगरविकास विभागाने केले आहे आणि याच विभागाकडून हे काम चालले आहे. या शहरातील मोकळ्या जागा, भूखंड यांच्या संदर्भात माझ्याकडे पर्यावरणाचा स्थितीदर्शक अहवाल आहे.....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी नावाचा उल्लेख केला आहे. मंत्री महोदयांनी हरकत घेण्याची गरज आहे काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा हा आहे की, सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर म्हणाले की, माननीय सदस्य श्री.किरण पावसकर नाव घेऊन बोलले. त्यांनी भूखंड अलॉट कोणाला झाला त्यांचे नाव सांगितले. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार अत्यंत चलाखीने बोलत आहेत. कोणाचेही नाव घेण्याचे टाळत आहेत. भूखंड मिळविणारे मंत्री कोणते, केंद्रीय मंत्री कोणते आहेत त्यांचे नाव न घेता उल्लेख करीत आहेत. एका बाजूला मंत्र्यांचा संदर्भ देऊन सत्ताधारी पक्षावर टीका करायचे,अंगुलीनिर्देश करायचे काम ते करीत आहेत. एखाद्याचे नाव घ्यायचे असेल किंवा हेत्वारोप करायचे असतील तर सेक्शन 35 खाली नोटीस द्यावी

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.....

लागते. माननीय सदस्यांनी अशी नोटीस दिलेली नसेल तर त्यांनी संपूर्ण मंत्रिमंडळाला संशयाच्या पिंजऱ्यात उभे करणे 100 टक्के चुकीचे आहे, आमच्या अधिकारावर अधीक्षेप करणारे आहे. सेक्शन 35 अन्वये नोटीस दिली पाहिजे, तशी नोटीस आपल्याकडे आली पाहिजे. तरच आरोप करता येतील. अन्यथा मंत्रिमंडळाला संशयाच्या पिंजऱ्यात उभे केले जात असेल तर त्यांचे संपूर्ण वक्तव्य कामकाजातून काढून टाकावे अशी माझी विनंती आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. निर्णय देण्यापूर्वी माझे म्हणणे ऐकून घ्यावे. सभापती महोदय, मी गेली 22-23 वर्षे विधिमंडळाच्या कामकाजात सहभाग घेत आहे. एखाद्या मंत्र्यांचे नाव घ्यायचे असेल तर आपल्याला नोटीस द्यावी लागते. माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी स्पेसिफिक क्लॉजचा संदर्भ दिला आहे, भूखंडाचा संदर्भ दिला आहे. ज्यांनी आरक्षण बदलून भूखंड मिळविला ते मंत्री कोण आहेत हे शोधण्याची जबाबदारी माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांची आहे. शासन ते चालवित आहेत. त्यामुळे ती त्यांची जबाबदारी आहे. माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांना नियमाप्रमाणे केंद्रीय मंत्र्यांचे नाव घेता येत नाही, त्यांच्याबद्दल नोटीस देता येत नाही.

सभापती महोदय, नगरविकास राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव अत्यंत चलाखीने आपला मुद्दा मांडून मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांची लाज राखण्याचा प्रयत्न करीत आहेत.

नंतर यू.1..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

माननीय मंत्री त्यावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करीत आहेत.

(गोंधळ)

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी आपला हरकतीचा मुद्दा ऐकला आहे. आता आपण खाली बसावे.

(दोन्ही बाजूंचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. रामदास कदम : तुम्हाला थोडी जरी लाज असेल तर जे कोणी झारीतील शुक्राचार्य असतील त्यांना लाथ मारून मंत्रिमंडळातून काढून टाकावे.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, हे काय बोलत आहेत ?

तालिका सभापती : मी ते वक्तव्य सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकत आहे. .... (अडथळा) ....

(दोन्ही बाजूंचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

मी ते वक्तव्य सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकले आहे. आता सुरू असलेल्या नियम 260 अन्वयेच्या चर्चेवर सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार हे ऑन लेग आहेत.

आता सभागृहाची बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 11.46 ते दुपारी 12.00 पर्यंत स्थगित झाली.)

(नंतर श्री. भारवि ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी.: श्रीमती कविता हेमंत करकरे यांना म्हाडाची सदनिका वितरित करणे

मु.शी.: श्रीमती कविता हेमंत करकरे यांना म्हाडाची सदनिका वितरित करणे यासंबंधी गृहनिर्माण राज्य मंत्र्यांचे निवेदन.

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

सभापती महोदय, आजच्या वर्तमानपत्रात शहीद श्री.हेमंत करकरे यांच्या घराच्या संबंधात एक बातमी आलेली आहे. मला आपल्या माध्यमातून सभागृहा पुढे निवेदन करावयाचे आहे. शहीद झालेल्यांच्या कुटुंबीयांना शासनाने म्हाडाच्या माध्यमातून घरे द्यावीत अशी मागणी करण्यात आली होती. त्यानुसार श्रीमती कविता करकरे यांना वर्सोवा येथे घराचे वितरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. म्हाडाचा असा नियम आहे की, ज्यांच्याकडे स्वत:चे घर नाही असे प्रतिज्ञापत्रावर लिहून द्यायचे आहे. श्रीमती कविता करकरे यांच्याकडून अद्याप पर्यंत प्रतिज्ञापत्र प्राप्त झालेले नाही. त्यांचे मुंबईत घर असले तरी त्यांना घर न देण्याची भूमिका शासनाची नाही. त्यांनी प्रतिज्ञापत्र दिल्यानंतर त्यांना ताबडतोब घर देण्याची कार्यवाही शासनाच्या माध्यमातून केली जाणार आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

सभापती : सभागृहाची बैठक मी 10.00 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे. कॅबिनेट मंत्री आल्यानंतर सभागृहाची बैठक पुन्हा सुरू होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.02 वाजता 10 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

सभापतीस्थानी - माननीय सभापती

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सदनामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांना सदनामध्ये यावे लागले अशी वाईट अवस्था आहे. मंत्रिमंडळाची काय अवस्था आहे ते पहा.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, याठिकाणी माननीय मुख्यमंत्री महोदय आले आहेत हा आपल्या सर्वांचा सन्मान आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मघाशी सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्याने कामकाज 10 मिनिटांसाठी स्थगित करावे लागले. आम्हाला माननीय मुख्यमंत्री महोदयांना सांगावयाचे आहे की, प्रश्नोत्तराच्या तासाला ही अवस्था असणे याचा अर्थ सरकारला विधी मंडळाच्या कामाकाजा विषयी खरेच गांभीर्य आहे की नाही अशी शंका उपस्थित होते. आता देखील माननीय मुख्यमंत्री सदनामध्ये आले आहेत, आम्ही त्यांचे आभार मानतो. बाकीचे माननीय मंत्री महोदय दिसत नाहीत. पण शहीद श्री.हेमंत करकरे यांच्या संबंधातील विषय सुरु झाल्याने आम्ही सभागृह बंद करीत नाही. कारण श्री.करकरे यांच्या कुटुंबीयांना आपण लगेच प्लॅट दिला नाही तो नाहीच. पण याबाबतीत माननीय मंत्री महोदय जे निवेदन करीत आहेत ते आम्ही ऐकत होतो. परंतु माननीय मुख्यमंत्री महोदयांनी बाकीच्या माननीय मंत्री महोदयांना सदनामध्ये येण्यासाठी निरोप पाठवावा एवढीच आमची विनंती आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, "दैनिक सामना"या वर्तमानपत्रामध्ये शहीद श्री.करकरे यांच्या कुटुंबीयांना म्हाडाने घर दिले नाही अशा प्रकारची बातमी आलेली आहे. मला शासनाच्या वतीने या निमित्ताने निवेदन करावयाचे आहे की, श्री.करकरे यांच्या पत्नी श्रीमती कविता करकरे यांना आपण वर्सोवा येथे फ्लॅट अलॉट केलेला आहे. फ्लॅट ॲलॉट केल्यानंतर एक नियम असतो की, मुंबई शहरामध्ये आपले घर आहे की नाही याची माहिती द्यावी लागते. पण आपण शहिदांच्या संदर्भात अशी कोणतीही अट ठेवलेली नाही. म्हणून या निमित्ताने मला असा खुलासा करावयाचा आहे की, त्यांना शासनाने जे घर देऊ केलेले आहे, त्याबाबतीत आपण वचनबध्द आहोत. त्यांना घर न देण्याची भूमिका शासनाची नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, याबाबतीत ॲफीडेव्हीट मागणार आहात की नाही? हे विचारले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : त्यांना म्हाडाचे घर देण्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. त्या अनुषंगाने कागदपत्रांची जी पूर्तता करावयाची आहे ती शासनाकडून करुन घेण्यात येईल.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जे सांगितले आहे, त्या बाबतीत जर आणखी काही स्पष्टीकरण करावे लागले तर ते करणे गरजेचे आहे. शासनाच्या वतीने कोणतेही घर देताना प्रतिज्ञा पत्र द्यावे लागते. संबंधितांकडे दुसरे घर आहे की नाही याची माहिती प्रतिज्ञा पत्राव्दारे द्यावयाची असते. जर संबंधितांकडे घर असेल तर आपण जनरली त्यांना घर देत नाही. पण यावेळेला आपण यामध्ये विशेष तरतूद केलेली आहे. त्यानुसार कोणतीही अट न घालता शासनाला त्यांना हे घर द्यावयाचे आहे आणि शासन ते देणार आहे. फक्त मी लिगली तपासून घेतो. पण त्यांना जर ॲफीडेव्हीट द्यावयाचे असेल तर त्यांनी ते दिले तरी हरकत नाही. श्रीमती करकरे लिहून देतील की, माझे घर आहे. याबाबतीत जी वस्तुस्थिती आहे ती सांगतील. पण ती अट आड येणार नाही. फक्त श्रीमती करकरे यांना ॲफीडेव्हीट द्यावे लागेल की नाही हे मी लिगली तपासून घेतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, त्यांना घर दिले आहे की नाही?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, त्यांना घर ॲलॉट झालेले आहे. फक्त ॲफीडेव्हीट द्यावे लागते ही अट असल्याने अडचण झालेली आहे. आपण फक्त एकच तपासून घेऊ की, जर ॲफीडेव्हीट द्यावयाचे असेल तर जी वस्तुस्थिती आहे ती देतील. पण ती अट आड येणार नाही.

. . . .डब्ल्यू-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : तोंडी उत्तरे

कमाल जमीन धारणा कायद्यान्वये झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्याबाबत

(1) *36747 श्री.विनोद तावडे, श्री.चंद्रकांत पाटील, ॲड.आशिष शेलार, श्री.रामनाथ मोते, श्री.मोहन जोशी : तारांकित प्रश्न क्रमांक 33324 ला दिनांक 12 डिसेंबर, 2012 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात. : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नागरी कमाल जमिन धारणा कायद्यांतर्गत शासनास ज्या सदनिका विकासकांमार्फत मिळावयाच्या होत्या त्या न मिळाल्यामुळे एकूण २३ विकासकांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या २३ विकासकांपैकी केवळ १३ विकासकांना अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, रेडी रेकनरच्या दराप्रमाणे शेकडो कोटी होणारी किंमत विकासकाकडून सक्तीने वसूल करण्याचा निर्णय होवूनही अद्यापपर्यंत केवळ २ कोटीं रुपयांची वसुली होवू शकली आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, उर्वरित विकासकांवर आर्जपर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(5) या संदर्भात अर्थसंकल्पीय अधिवेशनात चर्चा झाली असता मा. मुख्यमंत्री महोदयांनी या अनियमिततेची चौकशी करण्यासाठी नगर विकास विभागाचे अप्पर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची नेमणूक करण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(6) असल्यास, या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, असल्यास अहवालातील शिफारशींनुसार कोणत्या स्वरुपाची कारवाई शासनामार्फत करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

श्री.सचिन अहिर, श्री.पृथ्वीराज चव्हाण : (१) होय.

(2) सदरहू 23 विकासकांपैकी 14 विकासकांना अटक करण्यात आली असून उर्वरीत प्रकरणी तपास सुरु आहे.

(3) शासनदेय सदनिकांची बाजारभावाने होणारी किंमत या विकासकांकडून सक्तीने वसूल करण्याची कार्यवाही सुरु असून आतापर्यंत रु. 2,66,33,746/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.उर्वरित रक्कम वसूल करणेबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालया-मार्फत कार्यवाही सुरु आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(5) होय.

(6) सदर चौकशी अहवाल अद्याप अंतिम व्हावयाचा आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, खरे म्हणजे हा विषय मागच्या वषीच्या अधिवेशनामध्ये उपस्थित करण्यात आला होता. 23 विकासकांनी युएलसी खाली ज्या सदनिका राज्य शासनाला दिल्या पाहिजेत त्या न देता परस्पर बाजारभावाने बाजारामध्ये विकल्या. आम्ही या संबंधातील विषय बाहेर काढल्यानंतर वर्षभरापूर्वी 13 विकासकांना अटक झाल्याची माहिती दिली आणि आज अजून त्यामध्ये आणखी एकाची वाढ झाली म्हणजे ही संख्या 14 झाली आहे म्हणजे शासन किती गतीमान झालेले आहे. आम्ही मंत्रालयासमोर होर्डींग वाचतो की, गतीमान शासन आणि त्यावरील दोन फोटो पहातो.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36747....

श्री.विनोद तावडे....

आम्ही शासनाचे "सुशासन आणि गतिमान शासन" असे बोर्ड वाचतो. या प्रकरणात उशीर, दिरंगाई व कुचराई झालेली आहे हे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी वर्षभरापूर्वी मान्य केलेले आहे. त्यानंतर वर्षभरात काय प्रगती झाली त्याची माहिती आजच्या उत्तरामध्ये आलेली आहे. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने किती कालावधीत अहवाल द्यावा यासाठी काही मर्यादा घालण्यात आली आहे काय ? युएलसी प्राप्त सदनिकाचे वाटप करताना त्याबाबत अटी व शर्ती काय आहेत ? या प्रकरणात काही अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केल्याचे उघडकीस आलेले आहे त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली ? शासनास एकूण 847 सदनिका मिळणार होत्या. त्यातील काही सदनिका शासनाला मिळालेल्या आहेत तर अन्य सदनिका विकासकाने विकलेल्या आहेत. तेव्हा विकासकाची मालमत्ता जप्त करुन शासन रक्कम वसूल करणार आहे काय, मुंबईत अन्य कोणतेही कामे करण्यावर त्या विकासकांवर बंदी घालणार आहात काय ? पोलिसांनी या विकासकांना मुद्दाम सोडून दिलेले आहे त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी एक महिन्यात करुन योग्य ती कारवाई करण्यात येईल. माननीय उच्च न्यायालयाने स्टे दिल्यामुळे नागरी कमाल जमीन धारणा कायद्यांतर्गत विकासकांमार्फत मिळणाऱ्या सदनिकांचे वाटप करण्यात येत नाही. युएलसी अंतर्गत जे काही वाटप केलेले आहे त्याची माहिती पटलावर ठेवण्यास माझी तयारी आहे. अधिकाऱ्यांची चौकशी करण्यासाठी प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आलेली आहे. त्या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर त्यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, एकूण 24 प्रकल्प असले तरी त्यामध्ये 17 विकासक आहेत. एका विकासकाचे चार-चार प्रकल्प असल्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे. शासनाने विकासकांना रिकव्हरीची नोटीस दिलेली आहे. या पुढील काळात मुंबई शहरात नव्हे तर महाराष्ट्रात कुठेही त्यांची कामे सुरु असतील तर ती कामे थांबविण्याची कारवाई केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36747....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या विकासकांवर कोणत्या पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आणि किती वेळात त्यांना अटक करण्यात आली ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, या विकासकांविरुध्द मुंबईतील वेगवेगळ्या पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी दाखल झालेल्या आहेत. मालाड, वर्सोवा पोलीस स्टेशन व अन्य पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी दाखल झालेल्या आहेत. या विकासकांविरुध्द तक्रार प्राप्त झाल्यानंतर एका महिन्याभरात कार्यवाही होऊन त्यांना अटक झालेली आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये नमूद केले आहे, "सदर अहवाल अजून अंतिम व्हावयाचा आहे." या प्रकरणास अधिकारी जबाबदार आहेत हे सरकारने मागील वेळी मान्य केलेले आहे. ज्या अधिकाऱ्यांकडून दिरंगाई झाली त्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी अधिकाऱ्यांची चौकशी करण्यासाठी प्रधान सचिवांची समिती नेमलेली आहे. मध्यंतरी मंत्रालय इमारतीस लागलेल्या आगीमुळे तो अहवाल करता आला नाही. मी सुरुवातीलाच सांगितले की, या विभागाच्या प्रधान सचिवाकडून चौकशी करुन पुढील योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री.चंद्रकात पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, एकूण 17 विकासक आहेत. त्यापैकी 14 विकासकांना अटक झालेली आहे. अटक न झालेल्या तीन विकासकांची नावे काय आहेत, त्यांना केव्हा अटक करणार आहात ? एकूण 847 सदनिकांचा घोटाळा झालेला आहे. या सदनिका कलाकार आणि खेळाडूंना देण्यात येणार होत्या. परंतु त्यांना आता उशिराने सदनिका मिळतील. माझा प्रश्न आहे की, विकासकांची प्रॉपर्टी जप्त केल्यानंतर जी काही रक्कम प्राप्त होईल त्यातून मार्केटमधील सदनिका खरेदी करुन संबंधित लाभार्थ्यांना देणार आहात काय ?

यानतंर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : महोदय, पोलिसांनी कारवाई केलेल्या तीन पैकी एकाने सर्वोच्च न्यायालयातून कारवाईवर स्थगिती मिळविली आहे. दुसऱ्याने अँटीसिपेटरी बेल मिळविली आहे आणि तिसरा फरार असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आलेली आहे. आतापर्यंत वसुली प्रमाणपत्राप्रमाणे 2 कोटी रुपये वसूल करण्यात यशस्वी झालो आहोत. शासनाने ही रक्कम वसूल करण्याची भूमिका घेतली असली तरी, कलाकारांना नवीन घरे घेण्याची आवश्यकता नाही. म्हाडा किंवा अन्य माध्यमातून ती देण्याची तरतूद आहे.

डॉ.दीपक सावंत : महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी दोन वेळा सांगितले की, या संदर्भात संबंधितांवर कारवाई केली जाईल. मी विचारु इच्छितो की, ही कारवाई निश्चित किती दिवसांत केली जाईल ?

श्री.सचिन अहिर : महोदय, महिन्याभरानंतर या संदर्भातील अहवाल आल्यानंतर लगेच दुसऱ्या महिन्यात कारवाई करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आदिवासी विद्यार्थीनींसाठी असलेल्या निळ्या स्कुल बसचा सामान्य प्रवांशासाठी वापर केला जात असल्याबाबत

(२) * ३७०५२ डॉ. अपूर्व हिरे, श्रीमती अलका देसाई, श्री.सुभाष चव्हाण, श्री.संजय दत्त, प्रा.सुरेश नवले, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.सतीश चव्हाण, श्री.एम.एम.शेख, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानव विकास कार्यक्रमांतर्गत खास विद्यार्थीनींच्या वाहतुकीसाठी १०९ कोटी रुपये खर्च करुन ६२५ नवीन बसेस राज्य परिवहन महामंडळाला उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) मानव विकास मिशन योजनेतंर्गत आदिवासी बहुल भागातील दुर्गम मुलींना विद्यालयात जाणेकरिता शासनाने निळ्या रंगाची स्कूल बस उपलब्ध करुन दिली असताना, विद्यार्थीनीऐवजी सदरहू बसमधून सामान्य प्रवासी प्रवास करीत असल्याचे लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ४ सप्टेंबर, २०१२ चे पत्राद्वारे मा.परिवहन राज्यमंत्री यांचे निदर्शनास आणून दिले, हे खरे आहे काय,

(३) तसेच, मानव विकास मिशन योजनेअंतर्गत विद्यार्थीनींच्या मोफत प्रवासासाठी देण्यात आलेल्या एस.टी. बसेस लांब पल्ल्याच्या मार्गावर देण्यात येऊन विद्यार्थीनींसाठी एस.टी.च्या नादुरुस्त बसेस देण्यात आल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नादुरुस्त बसेस दिल्यामुळे विद्यार्थीनींना स्वखर्चाने प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुषंगाने विद्यार्थीनींसाठी मोफत प्रवासासाठी सुस्थितीत असलेल्या बसेस पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच या बसेसचा फायदा लाभार्थी विद्यार्थीनींना न देणाऱ्या एस.टी. महामंडाळाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गुलाबराव देवकर, श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

मानव विकास योजनेतील बसेसचा सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी तसेच मानव विकासची फेरी पूर्ण झाल्यानंतर अन्य वेळेत आमप्रवास वाहतुकीसाठी बसचा वापर केला जातो. बसचा चालनीय खर्च भरुन काढण्यासाठी व चालक/वाहक कामगिरी पूर्ततेच्या दृष्टीने सदर फेऱ्यांचे नियोजन केले जाते.

(३) हे खरे नाही.

शासनाकडून नवीन बसेसकरिता निधी प्राप्त होण्यापूर्वी व नवीन बसेस प्राप्तीची कार्यवाही पूर्ण होण्याआधी योजना अंमलबजावणीसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या चालनीय ताफ्यातील बसेस सदर योजनेकरिता उपलब्ध करुन दिल्या आहेत.

(४) हे खरे नाही.

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गटशिक्षण अधिकारी व गटविकास अधिकारी यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार विद्यार्थीनींच्या फेऱ्या चालविल्या जातात. या फेऱ्यांव्यतिरिक्त शालेय फेऱ्यांची मागणी नसलेल्या अन्य फेऱ्यांमधून प्रवास करणाऱ्या विद्यार्थीनींना त्यांच्याकडे मानव विकास योजनेचे पासेस नसल्याने राज्य परिवहनच्या प्रचलित नियमानुसार तिकीटे देण्यात आली. गटशिक्षण अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या विद्यार्थीनींच्या यादीनुसार सर्व विद्यार्थीनींना मानव विकास योजनेअंतर्गत पासेस देण्यात आले आहेत.
(५) मानव विकास योजनेच्या अंमलबजावणीसाठी क्षेत्रीय पातळीवर तालुका स्तरावर गटविकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आगार व्यवस्थापक, गटशिक्षण अधिकारी व शाळांचे मुख्याध्यापक यांची समिती नेमण्यात आली असून अंतिम निर्णय जिल्हाधिकारी यांचेस्तरावर घेण्यात येतात. शाळा दुर्गमतेचा विचार करुन मार्गनिश्चिती करण्याचे अधिकार सदर समितीस असून त्यांचे संयुक्त विचारविनिमयातून फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. राज्य परिवहन महामंडळ स्तरावर आगार पातळीवर लांब पल्ल्याच्या मार्गावर मानव विकास कार्यक्रमाची बस पाठविण्यासारख्या बाबींकरिता काही जबाबदार अधिकारी / कर्मचाऱ्यांवर प्रमादीय कारवाई, दंड करणे, सक्त ताकीद देणे इत्यादी कार्यवाही करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ.अपूर्व हिरे : सभापती महोदय, मानव विकास योजनेंतर्गत विद्यार्थीनींना मोफत बसची सुविधा दिली जाते. जास्तीत जास्त विद्यार्थीनींनी शाळेत यावे हा त्या मागील उद्देश आहे. मुळात शाळेचे वेळापत्रक किंवा परीक्षेचे वेळापत्रक विचारात घेऊन त्यांना बसेसची सुविधा मिळावयास पाहिजे. परंतु ती मिळत नाही. या उलट असे निदर्शनास आले की, मुलींसाठी पुरविण्यात आलेल्या बसेस खाजगी वाहतुकीसाठी वापरल्या जातात. ज्या ठिकाणी एस.टी.नादुरुस्त होतात त्या ठिकाणी या बसेस वापरल्या जातात. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, हे सर्व प्रकार थांबवून मानव विकास योजनेंतर्गत पुरविण्यात आलेल्या बसेस त्वरित विद्यार्थीनींना उपलब्ध करुन देण्यात येतील काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मानव विकास योजनेतून पुरविण्यात येणाऱ्या बसेससाठी तालुका स्तरावर समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्या समितीचे अध्यक्ष गट विकास अधिकारी असतात. शिवाय गट शिक्षणाधिकारी, आगार प्रमुख आणि शाळेचे मुख्याध्यापक त्या समितीवर आहेत. समितीने शाळांच्या बसचा रुट ठरवून दिलेला असतो. त्यानुसार बसेसची व्यवस्था केली जाते. एखाद्या ठिकाणच्या माध्यमिक शाळेचा 10-12 गावांशी संपर्क येतो त्या गावांतील विद्यार्थीनींना शाळेत ने-आण करण्यासाठी या योजनेतून बसेसची व्यवस्था केली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या बसेसना दिलेल्या कामा व्यतिरिक्त त्या बसेस इतर कामांसाठी वापरल्या जातात. या संदर्भात कडक सूचना दिल्या आहेत की, या बसेसचा वापर मानव विकास योजनेसाठीच केला जावा. ज्या ठिकाणी असे चुकीचे काम झाले आहे त्या ठिकाणी संबंधितांना ताकीद दिली असून, अधिकाऱ्यांवर कारवाई केली आहे.

डॉ.सुधीर तांबे : महोदय, अनेक विद्यार्थीनींना निरनिराळ्या माध्यमातून सवलती दिल्या जातात. नर्सिंग कोर्स करणाऱ्या विद्यार्थीनी कमकुवत घटकातील असतात. परंतु त्यांना अशा प्रकारे प्रवासाची सवलत दिली जात नाही. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, नर्सिंग कोर्स करणाऱ्या विद्यार्थीनींना मोफत बसची सवलत उपलब्ध करुन देण्यात येईल काय ?

श्री.गुलाबराव देवकर : महोदय, तूर्त या योजनेमध्ये इयत्ता 8 वी ते 12 वी पर्यंतच्या विद्यार्थीनींना सवलत देण्याचे धोरण ठरविले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थीनी इयत्ता 8 वी नंतर शिक्षण घेऊ शकत नव्हत्या. त्यांना कमीत कमी इयत्ता 12 वी पर्यंत शिक्षण घेता यावे म्हणून मानव विकास योजनेंतर्गत मोफत प्रवासाची योजना सुरु केली. शिवाय बाल विवाहाचे प्रमाण थांबविणे, कुपोषित बालकांचे प्रमाण थांबविणे हा या मागे चांगला उद्देश आहे. सध्या इयत्ता 8 वी ते 12 वी पर्यंतच्याच विद्यार्थीनींना मोफत प्रवासाची सवलत दिली आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, या प्रश्नातील प्रश्न क्रमांक-2 ला "शासनाकडून नवीन बसेसकरिता निधी प्राप्त होण्यापूर्वी व नवीन बसेस प्राप्तीची कार्यवाही पूर्ण होण्याआधी योजना अंमलबजावणीसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या चालनीय ताफ्यातील बसेस सदर योजनेकरिता उपलब्ध करुन दिल्या आहेत." असे लेखी उत्तर दिलेले आहे. परंतु प्रत्यक्षात हे प्रमाण घटले नाही. निळ्या रंगाच्या बसेस मानव विकास योजनेंतर्गत मुलींना ने-आण करण्यासाठी दिल्या आहेत. या बसेसवर 'स्कूल बस' असे लिहिले असले तरी त्या बसेस मुलींसाठी वापरल्या जात नव्हत्या. त्या बसेस लांब पल्ल्याच्या मार्गावर वापरल्या जात होत्या. या बाबत आम्ही माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, परिवहन महामंडळ यांना नोटीसेस दिल्या. प्रसंगी बसेस अडविल्या, आंदोलने केली. मुलींना सकाळी 11.00 वाजता शाळेत सोडल्यानंतर या बसेस औरंगाबाद-अमरावती, अमरावती-चंद्रपूर अशा लांब पल्ल्याच्या मार्गावर चालविल्या जातात. हे अंतर जास्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असल्यामुळे शाळा सुटण्याच्या वेळेपर्यंत बसेस पोहोचू शकत नाहीत. आम्हाला विद्यार्थीनींचे फोन येतात की, आता सायंकाळचे 7.00 वाजले तरी बस अजून आली नाही. त्यामुळे या पुढे प्रत्येकाला नोटीस देऊन या नंतर विद्यार्थीनींना शाळा सुटल्यानंतर स्टँडवर उभे करता येणार नाही अशी सूचना देण्यात येईल काय, तसेच अशा प्रकारची चूक झाली तर संबंधितांवर कारवाई करणार काय ?

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37052 ....

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी अतिशय चांगली सूचना केली होती. त्यांनी या अगोदरही पत्र दिले होते. या अनुषंगाने काही प्रतिनिधींच्या सुध्दा सूचना आल्या होत्या. या बाबतीत 7 विभागांच्या अधिकाऱ्यांवर काही ठिकाणी कडक कारवाई करण्यात आलेली आहे. नागपूर-चिमूर मार्गावर बस चालविली जात होती. चंद्रपूरच्या आगार व्यवस्थापकाला सक्त ताकीद दिलेली आहे. मुंबई-बिलोली मार्गावर बस चालविली जात होती. त्या ठिकाणी दोघांना सक्त ताकीद दिलेली असून आरोपपत्रे देण्यात आलेली आहेत. एका ठिकाणी निलंबनाची सुध्दा कारवाई केलेली आहे. अकोला जिल्ह्यांतर्गत बसेसचा योग्य वापर होत नव्हता म्हणून अकोला आगारातील वाहतूक निरीक्षक, चालक आणि वाहक या तिघांना निलंबित केले असून नियमित आरोपपत्र सुध्दा दिलेले आहे. या सर्व सूचनांचा आपण आदर केलेला आहे, कारवाई केलेली आहे. या संदर्भात सर्वच विभागांना सूचना दिलेल्या आहेत.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, बसचा चालनीय खर्च भरुन काढण्यासाठी व चालक/वाहन कामगिरी पूर्ततेच्या दृष्टीने सदर फेऱ्यांचे नियोजन केले जाते. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ एखाद्या कंपनीप्रमाणे चालते हे आम्हाला मान्य आहे परंतु मानव विकास कार्यक्रमांतर्गत डेडिकेटेड विषयासाठी या बसेसचा निधी आपल्याकडे आलेला आहे त्यामुळे त्या बसेस या कामाशिवाय इतर कोणत्याही कामासाठी वापरल्या जाणार नाहीत अशा प्रकारची योजना शासन का करु शकत नाही ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, अशाच पध्दतीची व्यवस्था केलेली आहे. त्यामध्ये ज्या काही त्रुटी होत्या त्या मी अगोदर सांगितलेल्या आहेत आणि त्या संदर्भात सूचना दिलेल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औरंगाबाद मनपाच्या समांतर जलवाहिनीचे काम पूर्ण करण्यासाठी करावयाच्या कार्यवाही

(३) * ३७१८७ श्री.सतीश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.एम.एम.शेख, श्री.किसनचंद तनवाणी : तारांकित प्रश्न क्रमांक ३३४६० ला दिनांक १९ डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात. : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद मनपाच्या समांतर जलवाहिनीसाठी दिनांक १० मार्च, २००९ च्या टेंडर प्रमाणे ठेकेदाराला वर्क ऑर्डर न देताच ठेकेदाराने ५० कोटीचे काम केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथील अधिवेशनात सभागृहात दिनांक १९ डिसेंबर, २०१२ रोजी प्रश्नाच्या उत्तरात दिनांक २० सप्टेंबर, २०१२ रोजी ठेकेदारास वर्क ऑर्डर दिल्याचे सांगितले, परंतु आजपावेतो अद्याप वर्क ऑर्डर न दिल्याने 'औरंगाबाद' सिटी वॉटर युटीलीटी कंपनीने माहे जानेवारी, २०१३ च्या दुसऱ्या आठवड्यात काम बंद केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबतीत खोटी माहिती देणाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भास्कर जाधव, श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (१) हे खरे नाही.

(२) औरंगाबाद महानगरपालिकेचा समांतर जलवाहिनी पाणी पुरवठा प्रकल्प सार्वजनिक खाजगी सहभाग तत्वावर (Public Private Partnership) राबविण्यात येत असल्याने या प्रकल्पाचे कार्यारंभ आदेश (work Order) देणे अपेक्षित नसून अपॉईटेड डेट (Appointed Date) जाहीर करणे अपेक्षित आहे.(Appointed Date) जाहीर करण्यासाठी कंडीशन प्रीसिडेंट (Conditions precedent) ची पूर्तता करणे आवश्यक आहे. कंडीशन प्रीसिडेंट (Conditions precedent) अंतर्गत प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यक निधी वित्तीय संस्थेकडून उपलब्ध होणार असल्याचा पुरावा देणे तसेच परफॉर्मन्स सेक्युरीटी (Performance Security) म्हणून रु. ७९.२२ कोटींची बँक गॅरंटी जमा करणे आवश्यक होते. परंतु असे न केल्यामुळे महानगरपालिकेने अपॉईटेड (Appointed date) जाहीर केलेली नाही. परिणामी औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनीने पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल दुरुस्तीचे काम बंद केले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, दोन वर्षापूर्वी ॲग्रिमेंट झाले. अजूनही या योजनेचे काम चालू झालेले नाही. त्या कॉन्ट्रॅक्टरला बाजारात कर्ज मिळत नाही. कॉन्ट्रॅक्टरमधील भांडणे आता कोर्टापर्यंत पोहोचलेली आहेत, हे शासनाला माहीत आहे का ? आम्ही दोन वर्षापासून ऐकत आहोत आणि या सभागृहामध्ये सुध्दा दोन तीन वेळा प्रश्न उपस्थित केलेला आहे. शासनाकडून असे उत्तर येते की, महानगरपालिकेला अधिकार आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37187 ..... श्री. सतीश चव्हाण....

श्री. तनवाणी उपस्थित आहेत. आमच्या घरात दर तीन दिवसाने फक्त एक तास पाणी येते. अकार्यक्षम महापालिकेमुळे शासन ही योजना ताब्यात घेऊन जीवन प्राधिकरणाकडे देणार का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, ही मूळ योजना यूआयडीएसएसएमटी मधून मंजूर होती. नंतरच्या काळात तेथील महापालिकेने ती योजना पीपीपीवर करण्याचा निर्णय घेतला. तो निर्णय घेतल्यानंतर त्या ठिकाणी जी बँक गॅरंटी वगैरे जमा करणे आवश्यक होते ते काम झाले नाही. दोन वर्षापासून ही योजना पूर्ण झालेली नाही. परंतु स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकारामध्ये ही योजना आहे ही वस्तुस्थिती आहे.

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, उत्तरामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, कंडीशन प्रीसिडंट केलेला नाही, परफॉर्मन्स सेक्युरिटी केलेली नाही. त्यांनी 80 कोटी रुपयांची बँक गॅरंटी दिलेली नाही. यामध्ये वेळेचा अपव्यय झालेला आहे आणि शहराचे नुकसान झालेले आहे त्यामुळे संबंधित कॉन्ट्रॅक्टरवर कारवाई करावी आणि त्यांना ब्लॅक लिस्ट करावे असे आदेश महापालिकेला देणार का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या संदर्भात महापालिकेने संबंधित कॉन्ट्रॅक्टरला खुलासा करण्यासाठी एक महिन्याची मुदत दिलेली आहे. त्या संदर्भामध्ये संबंधित ठेकेदाराचे काय उत्तर येते ते पाहून त्यानंतर या संदर्भातील कारवाई करणे उचित ठरेल.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, या प्रकल्पाची सुरुवातीची किंमत 369 कोटी 67 लाख रुपये होती आणि आता माझ्या माहिती प्रमाणे या प्रकल्पाची किंमत जवळजवळ 1300 कोटी रुपयांपर्यंत गेलेली आहे. टेंडर फक्त 800 कोटी रुपयांचेच काढले आहे. यामधील जो गॅप आहे ते 500 कोटी रुपये कोठून आणणार ? जर त्या ठेकेदाराची कार्यक्षमता नसेल तर त्यांना ब्लॅक लिस्ट करुन त्यांच्यावर कारवाई का करीत नाही, ती कारवाई शासन कधी करणार ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37187.....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मूळ योजना 359 कोटी 67 लाख रुपयांची होती. परंतु प्रत्यक्षात 792 कोटी 20 लाख रुपयांचे टेंडर काढण्यात आलेले आहे. त्यामुळे संबंधित ठेकेदार ही योजना पूर्ण करु शकेल की नाही याबद्दल शंका निर्माण व्हावी अशी एकूण परिस्थिती शासनासमोर आली आहे. त्यामुळे संबंधित ठेकेदाराला आयुक्तांनी रितसर एक महिन्याची नोटीस दिलेली आहे. त्या ठेकेदाराचे कंत्राट टर्मिनेट करावयाचे की ही योजनाच महानगरपालिकेकडून काढून घ्यावयाची याबाबत विचार करावा लागेल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाच्या लेखी उत्तरात प्रत्येक वाक्यात इंग्रजी शब्द आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे नेहमी मराठी भाषेचा आग्रह धरतात. आपणही अनेकदा शासनाला निर्देश दिलेले आहेत. तरीही लेखी उत्तरात इंग्रजी शब्दांचा सर्रास वापर केला जात आहे.

सभापती : मंत्री महोदयांनी लेखी उत्तरामध्ये इंग्रजी शब्द अपरिहार्य असेल तरच त्याचा वापर करावा अन्यथा मराठीत उत्तर देण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण सांगितलेले बरोबर आहे. मी एक गोष्ट विनम्रपणे सांगतो की, सन्माननीय सदस्यांना हरकत घेण्याचा अधिकार आहे. परंतु त्यांनी तो योग्य वेळी बजावलेला नाही हे आपण त्यांच्या लक्षात आणून द्यावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.किसनचंद तनवाणी : सन्माननीय मंत्री महोदयांनी आताच सांगितले की, त्या कंत्राटदाराला एक महिन्याची मुदत देण्यात आलेली आहे. संभाजीनगर शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी 2005 साली या प्रकल्पाची सुरुवात झाली. आता आपण 2013 मध्ये आहोत. हा प्रकल्प सुरु होऊन आठ वर्षे झालेली आहेत. आता महाराष्ट्र शासन, केंद्र शासन व महानगरपालिका यांच्या सहमतीने हा पीपीपी प्रकल्प होऊ घातलेला आहे. संभाजीनगर शहराला या प्रकल्पातून केव्हा पाणी मिळणार आहे याबाबत शासन ठोस उत्तर देणार आहे का ?

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37187....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये ही योजना सुरु होईल असे आश्वासक उत्तर दिले होते. तसा मला विश्वास होता. परंतु आज शासनासमोर आलेल्या माहितीनुसार संबंधित महापालिका व ठेकेदार हे काम करु शकेल असे वाटत नाही. सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. या प्रकल्पाबाबत ठोस निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे. त्यामुळे याबाबत माननीय मुख्यमंत्रीच योग्य ती भूमिका घेतील.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, औरंगाबाद महानगरपालिकेच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण योजना केंद्र सरकारच्या युआयडीएसएसएमटी कार्यक्रम अंतर्गत मंजूर करण्यात आली. औरंगाबाद शहराला पुरेसे पाणी मिळण्यासाठी ही योजना मंजूर केली होती. या शहराला अनेक योजनेतून पाणी मिळते. मलिक अंबरच्या काळापासूनच्या योजनेतून या शहराला पाणी पुरवठा होत आहे. या शहराला पुरेसे पाणी मिळण्यासाठी जवळपास 360 कोटी रुपयांची योजना मंजूर केली होती. त्यानंतर या योजनेची किंमत वाढली आणि स्कोपही वाढल्यामुळे ही योजना 790 कोटीपर्यंत पोहोचली आहे. बरेच दिवस झाल्यानंतरही या योजनेचे काम पूर्ण झालेले नाही. आता ही योजना पीपीपी तत्वानुसार करावयाची असल्यामुळे मूळ प्रश्नामध्ये वर्क ऑर्डर दिलेली आहे असे नमूद केलेले आहे ते योग्य नाही.

पीपीपीमध्ये इतर अटी घालाव्या लागतात. त्या अटीही पूर्ण झालेल्या नाहीत. पीपीपी करिता कन्सेशन ॲग्रीमेण्ट ज्या कंपनीला दिलेले आहे त्यांच्या भागीदारांमध्ये काही तरी वाद निर्माण झालेला आहे. त्यांच्यामध्ये दिवाणी दावे झालेले आहेत अशी शासनाची माहिती आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशा या सगळया बाबी असल्यामुळे किंमतीमध्ये वाढ झालेली आहे. हे काम त्या कन्सेशनर कडून, त्या माणसाकडून होणार नाही. त्या बाबतीत गंभीर भूमिका घेणे गरजेचे आहे. तरीही एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, औरंगाबाद महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असली तरी शासनाला निर्देश देता येतील. या बाबतीत जे जे काही करावयाचे आहे ते 30 दिवसात पूर्ण करा अशा प्रकारची नोटीस दिनांक 1 एप्रिलला दिलेली आहे. फायनान्शियल क्लोझर झालेले नाही. ते होण्याची शक्यता वाटत नाही. बँक गॅरण्टी द्यायची आहे, ती देखील अजून जमा केलेली नाही. एक महिन्याची नोटीस दिलेली आहे. त्यामध्ये हस्तक्षेप करणे योग्य होणार नाही. कन्सेशनर कडून कंडिशन्स प्रिसिडेण्टची पूर्तता झालेली नाही आणि होणार नाही याची मला खात्री आहे म्हणून तातडीने कायदेशीर बाबी तपासून कॉण्ट्रॅक्टच्या अटी प्रमाणे कॉण्ट्रॅक्ट रद्द करण्याचे निर्देश आयुक्तांकडून दिले जातील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सुधारित कॅन्टोन्मेंट कायद्यान्वये छावणी परिषदांना स्थानिक स्वराज्य संस्थाचा दर्जा देण्याबाबत

(४) * ३७३७७ श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुधारित कॅन्टोन्मेंट कायदा २००६ प्रकरण ६ कलम ११९ २ (१) मध्ये छावणी परिषदांना स्थानिक स्वराज्य संस्थाचा दर्जा देण्यात आला असून या क्षेत्रात शासनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्याबाबत मार्गदर्शक निर्देश आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तरीही राज्यातील छावणी परिषद क्षेत्रामध्ये राज्य शासनाच्या विविध विकासाच्या योजना राबविल्या जात नसल्याने छावणी परिषद क्षेत्रामध्ये राज्य शासनाच्या विकास योजनांचा लाभ देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१२ मध्ये वा तत्पूर्वी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (१) हे खरे नाही.
(२) (३) व (४) होय, सदर मागणी शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. जयवंतराव जाधव : कॅण्टोन्मेण्ट एरियामध्ये राहाणारे सर्व नागरिक हे देखील भारताचे सुजाण नागरिक आहेत. त्यांना देखील इतराप्रमाणे सोयीसुविधा मिळाव्यात ही त्याची अपेक्षा आहे. सुधारित कॅण्टोन्मेण्ट ॲक्ट 2006च्या प्रकरण 6 मधील कलम 119(2)(1) मधील तरतुदीमध्ये असे नमूद केलेले आहे की, "any sum received from the Central Government or the Government of any State by way of contribution grants subsides or by any other way for the implementation of any specific scheme or for the execution of any specific project." असे असताना कॅण्टोन्मेण्ट एरियामधील नागरिकांना कोणत्याही सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. या नागरिकांना नागरी सुविधा शासन उपलब्ध करुन देणार आहे काय ? माझ्या माहिती प्रमाणे ठराविक कण्टोन्मेण्ट एरियांना राज्य शासनाने निधी दिलेला आहे. नाशिक येथील देवळाली कॅण्टोन्मेण्ट एरियाचा प्रस्ताव राज्य शासनाकडे प्रलंबित आहे. त्या प्रस्तावाप्रमाणे राज्य शासन निधी उपलब्ध करुन देईल काय ?

श्री. भास्कर जाधव : कॅण्टोन्मेण्ट ॲक्ट 2006 च्या प्रकरण 6 मधील कलम 199 (2)(1)चा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला. राज्यामध्ये अशा प्रकारचे 7 कॅण्टोन्मेण्ट एरिया आहेत. मिलिटरी कायद्याप्रमाणे नागरी सुविधा त्या त्या स्तरावर केल्या जात होत्या. मध्यंतरी

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कॅण्टोन्मेण्टसंबंधीचा विषय माझ्याकडे आला होता. तो विषय मी चर्चेतून हातावेगळा केला. या विषयी सर्वसमावेशक आणि एकत्रितपणे निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यासाठी दिनांक 10 एप्रिल 2013 रोजी राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली मिटींग घेण्याचे ठरविण्यात आले होते. अविधवेशन चालू असल्यामुळे ही मिटींग होऊ शकली नाही. ही मिटींग महिन्याभरात घेतली जाईल. त्यामध्ये देवळाली पासून जितके कॅम्प आहेत त्यामध्ये नागरी सुविधा देण्याच्या बाबतीत शासन कोणकोणती जबाबदारी पार पाडील या संदर्भातील धोरण आखले जाईल.

डॉ. नीलम गो-हे : मंत्री महोदयांनी बैठकीची घोषणा केली ही चांगली गोष्ट आहे. पुणे शहरातील पुणे कॅण्टोन्मेण्ट आणि खडकी कॅण्टोन्मेण्ट या ठिकाणी निवडणुका होऊ घातलेल्या आहेत. निवडणूक आयोग कशा पध्दतीने आरक्षण करणार हा प्रश्न आहे, निधीचा प्रश्न देखील प्रलंबित आहे. माझी अशी सूचना आहे की, आपण जी बैठक घेणार आहात त्या बैठकीला कॅण्टोन्मेण्टच्या परिसराशी ज्या विधानसभा आणि विधानपरिषदेच्या आमदारांचा संबंध येतो त्यांना देखील बोलवावे. जिल्हा नियोजन समितीमध्ये छावण्यांच्या क्षेत्राबाबत चर्चा होऊ शकत नाही. वर्षानुवर्षे महानगरपालिका विरुध्द कॅण्टोन्मेण्ट एरिया असे विवाद होत असतात.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

आणि म्हणून महापालिकेच्या लोकांचा सुध्दा त्यात अंतर्भाव करुन घेतला जाईल काय आणि तशा प्रकारची बैठक घेण्यात येईल काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ही बैठक मी घेणार नसून मुख्य सचिव घेणार आहेत. अधिकारी पातळीवर बैठक होईल. त्यानंतर जर हस्तक्षेप करण्याची आवश्यकता आहे असे वाटले तर सन्माननीय सदस्यांना बोलावले जाईल. त्या भागातील लोकांना सुध्दा या प्रक्रियेमध्ये सामावून घेणार काय ही बाब सुध्दा त्या बैठकीच्या अनुषंगाने तपासून घेऊन कायदेशीर तरतूद काय आहे हे पहावे लागेल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या राज्यात 7 कटक मंडळे आहेत, त्यांची प्रत्येकी सरासरी 50 हजार लोकसंख्या विचारात घेता एकूण 3.5 लाख लोकवस्तीचा हा प्रश्न आहे. ब्रिटिशांच्या काळात निर्माण झालेल्या या संस्था आहेत. त्या ठिकाणी संरक्षण विभागातील लोक प्रमुख अधिकारी म्हणून येतात. नागरी आणि संरक्षण विभागांमध्ये वाद निर्माण होतात. तेथील जनता महापालिकेच्या क्षेत्राच्या टोकाला असताना सुध्दा त्यांना नागरी सुविधा मिळत नाहीत, त्यांचे प्रश्न सोडविले जात नाहीत. त्याकरिता या कटक मंडळांबाबत संरक्षण विभागाला मध्यस्थी करण्यास सांगून नागरी सुविधांसाठी हे भाग नजिकच्या महापालिकांच्या क्षेत्रात सामावून घेऊन त्यांच्याकडील नागरी सुविधांचे फायदे या क्षेत्रातील लोकांना मिळतील अशा दृष्टीने रचना करता येण्याची शक्यता आहे काय?

श्री.भास्कर जाधव : हा नवीन विषय आलेला असल्यामुळे मी मध्यंतरी दोन वेगवेगळ्या कारणांसाठी बैठका घेतल्या होत्या. त्या बैठकीला संरक्षण विभागाचे अधिकारी आले होते. सर्वसमावेशक असा विषय असल्यामुळे धोरण ठरवावे लागेल. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली बैठक व्हावी, त्या अनुषंगाने सर्व प्रश्नांचा उहापोह त्या बैठकीत होईल.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, तीन वर्षापासून सुविधा मिळण्याकरिता आम्ही मागणी करीत आहोत. मंत्री महोदयांनी सांगितले की, एका महिन्यात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेणार आहोत. राज्य शासनाची भूमिका काय आहे हे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट करावे. त्यांना निधी उपलब्ध करुन देणार की नाही या संदर्भात शासनाची जबाबदारी म्हणून मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी स्पष्टता करावी.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, राज्यमंत्र्यांनी या प्रश्नाबद्दल बरेच स्पष्टीकरण दिलेले आहे. या कटक मंडळांना डीम्ड महापालिकेचा दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे केंद्र सरकारने विचारणा केल्याप्रमाणे, ज्या केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजना आहेत त्यात राज्याचा जो हिस्सा आहे तो रक्षा मंत्रालयाने किंवा कटक मंडळाने द्यावा याबद्दल चर्चा सुरु आहे. केंद्र सरकारने आपल्याला विचारले आहे. त्याबद्दल आम्ही केंद्र सरकारच्या हुपा मंत्रालयाकडे राज्य सरकारचा हिस्सा कसा उपलब्ध करुन देता येईल याची विचारणा केली होती. त्या पार्श्वभूमीवर त्या कॅण्टोन्मेंट क्षेत्रासाठी बीपीएलची यादी तयार करुन ती डिस्ट्रिक्ट अर्बन डेव्हलपमेंट एजन्सीला देऊन नंतर स्वर्णजयंती रोजगार योजनेसारख्या योजनेमधून बीपीएल लाभार्थ्यांना पैसा देता येईल, अशा प्रकारे केंद्र सरकारच्या अर्बन डेव्हलमेंट मंत्रालयाला माहिती दिली आहे.

सभापती महोदय, राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे या संदर्भात अजून स्पष्टता येणे गरजेचे आहे. केंद्र सरकारची याबद्दलची भूमिका सकारात्मक असली तरी मुख्य सचिवांची समिती नेमली आहे त्यात स्पष्टता आल्यानंतर पुढील निर्णय घेता येईल.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील बोगस शिधापत्रिका धारकांवर कारवाई करण्याबाबत

(५) * ३८०१२ ॲड.आशिष शेलार, श्री.विनोद तावडे, श्री.चंद्रकांत पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.वसंतराव खोटरे, श्री.विक्रम काळे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.हेमंत टकले, श्री.सतीश चव्हाण : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोगस शिधापत्रिका बाळगणाऱ्या व इतर संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने गेल्या वर्षी राज्य शासनाला दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यात गेल्या चार-पाच वर्षात ४० लाखाहून अधिक बोगस शिधापत्रिकाधारक आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) बोगस शिधापत्रिकांवर आळा घालण्यासाठी व शिधापत्रिकेच्या शहानिशेसाठी आधार कार्डचा उपयोग करण्याचा शासन निर्णय घेणार आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र राज्यातील बनावट शिधापत्रिका घोटळ्याप्रकरणी उच्च न्यायालयात जनहित याचिकेबाबत शिधापत्रिकेच्या शहानिशेबाबत आधारकार्ड सक्तीचे करण्याची सूचना न्यायालयाने राज्य शासनाला केल्याची बाब दिनांक २९ डिसेंबर, २०१२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, आतापर्यंत किती बोगस शिधापत्रिकाधारकांवर कारवाई करण्यात आली आहे व कारवाईचे स्वरुप काय आहे,

(६) असल्यास, सदर शिधापत्रिका देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे, श्री.अनिल देशमुख यांच्याकरिता : (१) याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्र.१९६/२००१ च्या संदर्भात दिनांक ३१.८.२०१० रोजीच्या सुनावणीत असे निर्देश दिलेले आहेत.

(२) राज्यामध्ये सन २००५-०८, २००९-१० व सन २०११ मधील तीन अपात्र शिधापत्रिका शोध मोहिमांदरम्यान ज्या शिधापत्रिकाधारकांनी विहित नमुन्यातील अर्ज विहित वेळेत भरुन दिलेले नव्हते अथवा अर्जासोबत पुराव्याचे कागदपत्र सादर केले नव्हते अशा शिधापत्रिकाधारकांच्या एकूण ५४.०६ लक्ष शिधापत्रिका अपात्र ठरवून रद्द केल्या आहेत. मात्र या शिधापत्रिकांना बोगस शिधापत्रिका म्हणता येणार नाही. यापैकी ज्या शिधापत्रिकाधारकांनी विहित वेळेनंतर आवश्यक ते पुरावे सादर केले आहेत त्यांना शिधापत्रिका पुन्हा चालू करुन देण्यात आल्या आहेत.

(३) व (४) बोगस शिधापत्रिकाधारकांवर आळा घालण्यासाठी राज्यातील शिधापत्रिका आधार कार्डाशी संलग्न करण्याचा विचार करावा अशी सूचना मा.उच्च न्यायालयाने दिनांक १८.१२.२०१२ रोजी एका प्रकरणात सुनावणीच्या वेळी केली आहे. तथापि त्यापूर्वीच राज्यातील सर्व शिधापत्रिकांचे संगणकीकरणाचे काम हाती घेतले असून ज्या शिधापत्रिकाधारकांकडे आधार कार्ड आहे, त्याची नोंद घेण्यात येत आहे. परंतु राज्यात अजून आधारकार्ड वाटपाचे प्रमाण कमी असल्याने शिधापत्रिका आधारकार्डाशी सक्तीने संलग्न करण्याचा निर्णय घेण्यात आला नाही.

(५) राज्यात ३७ बोगस शिधापत्रिकाधारकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(६) सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत शिधापत्रिका वितरित करताना अनियमितता करणाऱ्या २४८ अधिकारी/कर्मचारी यांचेवर शिस्तभंगविषयक व विभागीय चौकशीची कारवाई करण्यात येत आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

..४..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, ५४ लाख शिधापत्रिका अपात्र ठरल्याचे उत्तरात नमूद केले आहे. ५४ लाख शिधापत्रिका धारकांपैकी काहींनी विहित वेळेत पुरावे सादर केले नाहीत, कागदपत्रे सादर केली नाहीत. तरी देखील फक्त ३७ बोगस शिधापत्रिका धारक सापडले, त्यांच्यावर केसेस दाखल केल्याचे उत्तरात नमूद केले आहे. २४८ अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची व विभागीय चौकशीची कारवाई करण्यात येत आहे. वृत्तपत्रामध्ये मागील दोन दिवसांपासून बातम्या छापून येत आहेत.

नंतर २डी.१...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38012 ....

ॲड. आशिष शेलार ....

अमरावती येथे संबंधित विभागाने माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या नावे पिवळी शिधापत्रिका दिली आणि माननीय मुख्यमंत्र्यांना बीपीएल घोषित केले. सन्माननीय श्री. मोदी साहेबांना देखील बीपीएलमध्ये आणले. 54 लाख अपात्र शिधापत्रिकांमध्ये कित्येक शिधापत्रिका बोगस असतील. शासनाकडून या बाबतीत उच्चस्तरिय चौकशी करण्यात येणार का, 248 अधिकारी/कर्मचारी शिस्तभंगाच्या कारवाईत दोषी सापडल्यास त्यांच्यावर क्रिमिनल केसेस दाखल करण्यात येणार का ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, 248 मधील 185 अधिकारी/कर्मचारी यांच्यावर शिक्षेची कारवाई करण्यात आली आहे. 3 जणांना निलंबित केले आहे. उर्वरित व्यक्तींची चौकशी सुरू आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, अपात्र शिधापत्रिका वेगळ्या आणि बोगस शिधापत्रिका वेगळ्या आहेत. आताच सन्माननीय सदस्यांनी जे अमरावतीचे उदाहरण दिले, ती बोगस शिधापत्रिका आहे. सन 2005 पासून आतापर्यंत अपात्र शिधापत्रिकांच्या संदर्भात 3 शोध मोहिमा राबविल्या आहेत आणि त्यामध्ये 54 लाख शिधापत्रिका अपात्र सापडल्या आहेत. विहित नमुन्यात माहिती दिली नाही, तपशील दिला नाही, उत्पन्नाचा दाखला दिला नाही, स्थलांतर झाल्यामुळे कागदपत्रे सादर केली नाहीत, फॉर्ममध्ये संपूर्ण महिती दिली नाही, त्यांच्या शिधापत्रिका अपात्र घोषित करण्यात आल्या आहेत. आम्ही अमुक तारखेपर्यंत माहिती देऊ शकलो नाही, आता आम्ही संपूर्ण माहिती देतो असे कोणी म्हटले तर त्यांचा विचार करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी बोगस शिधापत्रिकेबाबत विचारले आहे. अमरावती येथील विभागातून माननीय मुख्यमंत्र्यांच्या नावाने बीपीएलची शिधापत्रिका काढण्यात आली, असे सांगण्यात आले. आम्ही त्या संदर्भात माहिती घेतली असता, असे समजले की, त्या कार्यालयातून काही रिक्त शिधापत्रिका चोरी झाल्या होत्या आणि त्याचा वापर अशा पध्दतीने केला आहे. रिक्त शिधापत्रिका गहाळ झाल्याबाबतचीही चौकशी केली असून शिधापत्रिकांच्या कस्टोडियनवर कारवाई प्रस्तावित केली आहे. आतापर्यंत 37 बोगस कार्ड धारक आढळले असून त्यांच्यावर कारवाई केली आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38012 ....

श्री. विनायक राऊत : सभापती महोदय, मुंबईसह महाराष्ट्रात बोगस शिधापत्रिका कशा पध्दतीने दिल्या जातात, हे सर्वश्रूत आहे. मिरा-भाईंदर सारख्या भागात छोटा पाकिस्तान, बांगलादेश असा पत्त्यांचा उल्लेख करून किती शिधापत्रिका दिल्याचे निदर्शनास आले आहे. त्या ठिकाणी अशा पध्दतीने झालेल्या बोगस कारभाराच्या संबंधी नेमकी कोणती कारवाई केली ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, आम्ही आमच्या माध्यमातून चौकशी करू. आपण अधिकची माहिती दिली तर त्या संदर्भात चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात येईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, हा महत्त्वाचा व संवेदनशील प्रश्न आहे. प्रश्नाच्या उत्तरात सांगितले आहे की, 54.06 लक्ष शिधापत्रिका अपात्र ठरवून रद्द केल्या आहेत. माननीय मंत्र्यांनी अपात्र शिधापत्रिकांच्या संदर्भात खुलासा केला आहे. राज्यात फक्त 37 बोगस शिधापत्रिका आहेत, हे कोणाला खरे तरी वाटेल का ? मला याची कमाल वाटते. मला विचारावयाचे आहे की, राज्यात 37 बोगस शिधापत्रिका आहेत तर मग 248 अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई का केली ? देशातील इतर राज्यांत संगणकीकरण होऊन लाभधारकांना जीवनावश्यक वस्तू मिळू लागल्या आहेत. महाराष्ट्र पुरोगामी आहे, असे जर आपण म्हणत असू तर आपल्या राज्यात आपण अशी कार्यवाही कधी करणार आहात ? आपल्याही राज्यात इतर राज्यांप्रमाणे संपूर्ण संगणकीकरण करून गरिबांना पारदर्शकतेने जीवनावश्यक धान्य मिळेल का ? बोगस शिधापत्रिका देणाऱ्यांच्या बाबतीत उच्चस्तरिय चौकशी होऊन त्यांच्यावर पोलीस कारवाई करणार का ?

(नंतर श्री. भारवि ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, ज्यांच्याकडे बोगस शिधापत्रिका आढळतील त्यांच्या विरूद्ध कडक कारवाई करण्यात येईल हे मी मघाशीच सांगितले आहे. सन्माननीय सदस्यांनी संगणकीकरणा संबंधी प्रश्न विचारला आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्था संगणकीकृत करण्यासंबंधी राज्य सरकारने पावले उचलली आहेत. यासंबंधातील जबाबदारी प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यावर सोपविण्यात आली आहे. आज महाराष्ट्रात 94 टक्के डिजिटलायझेशनचे काम झालेले आहे. महाराष्ट्रात 2 कोटी 27 लाख कार्डधारक असून त्यापैकी 2 कोटी 13 लाख कार्डांची ऑल रेडी एन्ट्री पूर्ण करण्यात आलेली आहे. अशा प्रकारे महाराष्ट्रात 94 टक्के काम झालेले आहे. उर्वरित काम लवकरात लवकर करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पुढच्या एक महिन्यामध्ये डिजिटलायझेशनचे काम करावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत. यासाठी आम्ही केंद्र शासनाच्या एनआयसी ची आम्ही मदत घेत आहोत. सार्वजनिक वितरण व्यवस्था लवकरात लवकर संगणकीकृत कशी करता येईल यासाठी शासन प्रयत्नशील असून त्याद्वारे पारदर्शकता आणण्याचे काम करण्यात येत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय आम्हाला मूर्ख समजत आहेत असे दिसते. 54 लाख अपात्र शिधापत्रिका आहेत. त्यांचे धान्य आपण उचलले होते काय ? आमच्या माहिती प्रमाणे ते धान्य उचलले होते. या विषयामध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने आपण सचिवांना घेऊन येता की नाही, या भाषेमध्ये चपराक मारली आहे. त्यांचा निर्णय आपण वाचावा. असे असताना शासन हा प्रश्न गांभीर्याने घेत नाही. या विषयावर सर्वोच्च न्यायालयात सणसणीत चपराक बसल्यानंतर शासन सुमोटो एवढे अपात्र,बोगस शिधापत्रिका आहेत असे घोषित करेल असे वाटले होते. शेवटी भ्रष्टाचार हा त्यातच गुंतलेला आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38012...

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, सी.एम. आज बीपीएलधारक झालेले आहेत. कारण सरकारने आज पुष्कळ कर्ज काढलेले आहे त्यामुळे ते बीपीएलधारक असणारच. खरे म्हणजे त्यांनी अमरावती ऐवजी कराड येथे कार्ड काढले पाहिजे होते. 2 लाख 45 हजार कोटीचे कर्ज असल्यामुळे आमच्या राज्याचे मुख्यमंत्री बीपीएलमध्ये आले असतील. 3 पैकी 1 कार्ड हे बोगस किंवा अपात्र आहे. त्यामुळे माझी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, या प्रकरणाची आपण उच्चस्तरिय चौकशी केली पाहिजे, तरच यातील भ्रष्टाचार थांबू शकेल. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देऊन सुद्धा आपण या भ्रष्टाचाराला पाठिंबा देत आहोत असा मेसेज जाऊ शकेल म्हणून आपण यासंबंधातील चौकशी करणार आहात काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, अपात्र शिधापत्रिकेची शोध मोहीम सन 2005 पासून सुरू करण्यात आली आहे हे मी आधीच सांगितले आहे. सन 2005 पासून 2011 पर्यंत आम्ही शिधापत्रिका शोध मोहीम घेतली होती. आम्ही दरवर्षी प्रत्येक जिल्ह्यामध्ये, तालुक्यामध्ये अपात्र शिधापत्रिकांची शोध मोहीम घेतो. त्याद्वारे आम्ही अपात्र शिधापत्रिका रद्द करण्याचे काम देखील केलेले आहे. आता पर्यंत आम्ही 54 लाख शिधापत्रिका रद्द केल्या आहेत. अपात्र आणि बोगस शिधापत्रिका यात सन्माननीय सदस्यांचा गोंधळ होत असल्याचे दिसते.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, शासनाने अपात्र शिधापत्रिकेवरील धान्य उचलले आहे काय ते सांगावे ?

सभापती : माननीय मंत्री महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि अन्य माननीय सदस्यांची अशी अपेक्षा आहे की, सन 2005 पासून आता पर्यंत वेगवेगळ्या पद्धतीने किती बोगस, अपात्र रेशन कार्ड सापडली असून किती धान्य उचलण्यात आलेले आहे अशा प्रकारची माहिती त्यांना पाहिजे आहे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, व्यक्तीचे उत्पन्न हे चार-पाच वर्षाने वाढू शकते. आज एखाद्या व्यक्तीने सांगितले की, माझे उत्पन्न पाच हजार आहे. ते काही वर्षांनी वाढू शकते. सभापती महोदय, कार्डधारकांनी आपली माहिती विहित नमुन्यात दिली नाही तर....

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38012 . . . .

सभापती : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्यांचे असे मत आहे की, रेशन कार्डच्या माध्यमातून गरिबांना आपण धान्य देतो. आता जेवढी रेशन कार्डस् आहेत तेवढे धान्य आपण उचलतो. पण प्रत्यक्षात त्यापैकी हजारो, लाखो रेशन कार्डस् जर बेकायदेशीर असतील, गैर असतील किंवा बोगस असतील तर त्याचा हिशोब घेतला पाहिजे आणि जर ती गैर असतील तर त्याची उच्चस्तरिय चौकशी आपण करणार आहात काय? असा सन्माननीय सदस्यांचा मूळ प्रश्न आहे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा आग्रह आहे आणि मी परत सांगतो की, आम्ही याबाबतीत ऑलरेडी शोध मोहीम घेऊन हे आयडेंटीफाय करतो . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, माझे उत्तर पूर्ण होऊ द्या.

सभापती : माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्या.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर पूर्णपणे ऐकून घ्यावे. सन्माननीय सदस्यांना जे उत्तर अपेक्षित आहे तेच दिले पाहिजे असे जरुरी नाही.

सभापती : सन्माननीय मंत्री महोदयांनी माझ्याकडे पाहून बोलावे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, शासनाच्या माध्यमातून दरवर्षी शोध मोहीम राबविली जाते. त्यामधून गेल्या 7-8 वर्षामध्ये बोगस कार्ड आढळलेली आहेत. त्याबरोबर जी बोगस कार्ड आहेत त्याचाही मी आकडा सांगितला आहे. सन्माननीय सदस्यांना सांगितले आहे की, आम्ही दरवर्षी ही मोहीम राबवितो. याची चौकशी केली पण याबाबतीत आपल्याला कोणती चौकशी अपेक्षित आहे?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, तुमच्या भाषेमध्ये अपात्र तर अपात्र. पण सन्माननीय सदस्यांचे एवढेच म्हणणे आहे की, मी कागदपत्रे दिली नसताना सुध्दा मला कार्ड मिळाते आणि माझ्या नावावर रेशन येते आणि ते माझ्यापर्यंत न येता कुठे जाते हे सगळयांना माहिती आहे. परंतु कागदपत्रे पूर्ण नसताना अशा प्रकारे कार्ड इश्यू कशी झाली हा प्रश्न आहे. असे प्रकार कोण करीत आहेत, त्यांचे लागेबांधे काय आहेत आणि ते कुठपर्यंत पोहोचले आहेत याबाबतीत उच्चस्तरीय चौकशी व्हावयास पाहिजे. कारण ही गरिबांच्या धान्याची लूट आहे असे आमचे मत आहे.

. . . .2 एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38012 . . . .

श्री.अनिल देशमख : सभापती महोदय, ज्यांनी-ज्यांनी ही कार्ड इश्यू केली आहेत, त्या बाबतीत मी अगोदरच सांगितले आहे की, याबाबतीत 185 अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली असून 3 अधिकाऱ्यांना सस्पेंड करण्यात आले आणि बाकी कारवाई चालू आहे. यामध्ये जे अपात्र आढळले आहेत, त्यांना कोणकोणत्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकारामध्ये कार्ड दिली याची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही याची उच्चस्तरीय चौकशी करु आणि आम्ही त्याचे स्वागत करतो. परंत आपल्याच उत्तरामध्ये म्हटल्या प्रमाणे 248 अधिकाऱ्यांच्या बाबतीत कारवाई केली असे म्हटले आहे आणि त्यातील 3 जणांना सस्पेंड केले आहे असेही नमूद केले आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, कोणाला सस्पेंड केल्या नंतर आम्हाला आनंद होत नाही. परंतु आज इतक्या मोठ्या प्रमाणात आपल्यासमोर एवढ्या गोष्टी आल्यानंतर जे 248 अधिकारी आपल्या दृष्टोपत्तीस आले आहेत, त्यापैकी केवळ तीनच लोकांवर सस्पेन्शनची कारवाई का करण्यात आली आणि बाकीच्या लोकांवर केवळ विभागीय चौकशीची कारवाई का करण्यात आली? याबाबतीत जे प्रमख अधिकारी असतील त्यांना जबाबदार धरुन सस्पेंड करण्यात येणार आहे काय? असा माझा प्रश्न आहे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, यामध्ये जे अधिकारी दोषी आढळतील आणि त्यांच्या कडून ज्या प्रकारची चूक झाली असेल त्यानुसार त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझे दोन प्रश्न आहेत. सन्माननीय मंत्री महोदयांनी पहिल्या प्रश्नाच्या बाबतीत सांगितले की, दोन अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे आणि बाकीच्यांची खातेनिहाय चौकशी चालू आहे. पण दोन अधिकाऱ्यांना कधी निलंबित करण्यात आले आणि याला किती कालावधी झाला? संबंधितांची खातेनिहाय चौकशी कधी पूर्ण होणार आहे? कारण निलंबन म्हणजे शिक्षा नाही. तसेच याबाबतीत उच्चस्तरीय मान्य केली आहे.काल या सदनामध्ये चर्चा झाली. मुंब्रा येथे जी इमारत कोसळली, त्याबाबत चौकशी मान्य केली आणि याबाबतीत श्री.बक्षी यांची नेमणूक केली आहे ते महानगरपालिकेमध्ये होते आणि त्यांच्या काळातच जास्त बेकायदेशीर बांधकाम झाले आणि येथेही त्यांचीच नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे उच्चस्तरीय चौकशी करण्यासाठी नेमके कोणाला नेमणार आहात? हे आम्हाला कळले पाहिजे.

. . . .2 एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, उच्चस्तरीय चौकशीमध्ये प्रामुख्याने त्या-त्या डिव्हीजनचे जे डिव्हीजनल कमिशनर असतील, त्यांच्या माध्यमातून ही चौकशी करण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, जर कोणाकडे वास्तव्याचे पुरावे नसतील तर ऑफीसमधून संबंधितांकडे अशी मागणी केजली जाते की, पाच हजार रुपये द्या, सात हजार रुपये द्या. मग आम्ही तुम्हाला रेशन कार्ड बनवून देतो. लोकांना देखील रेशन कार्डाची आवश्यकता असते. त्यामुळे लोक संबंधितांची मागणी पूर्ण करतात. यामध्ये लोकांचा दोष नाही. त्याठिकाणी जे अधिकारी बसलेल आहेत . . . .

सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी प्रश्न विचारावा.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मला माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, या सगळया गोष्टी एवढ्या खुलेआम सुरु आहेत.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38012....

श्रीमती विद्या चव्हाण....

गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात येईल अशाप्रकारचे परिपत्रक शासन काढणार काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, होय.

सभापती : आज प्रश्नोत्तराचा तास दुपारी 12 वाजून 12 मिनिटांनी सुरु झाला. तेव्हा प्रश्नोत्तराचा तास संपण्यास अजून बारा मिनिटे शिल्लक आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अमरावती शहरातील सहा महिन्यापूर्वी काढण्यात आलेले

आधारकार्ड कचराकुंडीत आढळल्याबाबत.

(6) * 38305 **श्री.रमेश शेंडगे, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर, श्री.प्रवीण पोटे पाटील, डॉ.रणजित पाटील** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अमरावती शहरातील बुधवारा परिसरातील कचराकुंडीत सहा महिन्यापूर्वी काढण्यात आलेली 2000 आधारकार्ड टाकून दिल्याचे माहे जानेवारी, 2013 च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : (1) होय.

(2) होय.

(3) व (4) अमरावती शहर व तालुक्यातील एकूण 19 पोस्ट ऑफिसमध्ये 3236 आधारकार्ड वाटप करण्याचे शिल्लक असल्याचे निदर्शनास आले. मुख्य पोस्ट मास्तर जनरल, मुंबई यांच्या निदर्शनास सदर बाब आणण्यात आली असून संबंधितांवर कारवाई करण्याची विनंती करण्यात आली आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, शासनाच्या विविध योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आधारकार्डाची निर्मिती करण्यात आली आणि त्याचे वाटप सुध्दा करण्यात येत आहे. आधारकार्डाची योजना अतिशय महत्वाची आहे. अमरावती जिल्ह्यामध्ये तयार झालेली आधारकार्ड लाभार्थ्यांना मिळण्याऐवजी दोन हजार आधारकार्डांचा गठ्ठा कचऱ्याच्या डब्ब्यामध्ये सापडला. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना पंचनामा करण्यास सांगितले असता त्यामध्ये तथ्य असल्याचे आढळून आले आहे. अशाप्रकारचा गंभीर मुद्दा समोर आला आहे. ज्यांनी हा गुन्हा केला त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली ? आपण दुष्काळ निवारण्यासाठी केंद्राकडे मदत मागितल्यानंतर आपणास हजार कोटी रुपये मिळण्यास देखील खूप त्रास होतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38305...

श्री.रमेश शेंडगे....

माझ्या माहितीप्रमाणे आधारकार्डाचे योग्य पध्दतीने वाटप झाले तर शासनाचे वर्षाला जवळपास पाच हजार कोटी रुपये वाचतील. कारण आपणास बोगस लाभार्थी शोधून काढता येतील. माझे प्रश्न आहेत की, आतापर्यंत किती आधारकार्ड तयार झालेली आहेत, किती लाभार्थ्यांना त्याचे वाटप झालेले आहे, टपाल खात्याकडून आधारकार्डाचे वाटप होत नसेल तर शासन पर्यायी व्यवस्था करणार आहे काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, प्रत्येक नागरिकाला आधार क्रमांक आणि विशिष्ट ओळख करुन देणे अशी ती योजना आहे. ही देशातील नव्हे तर जगातील मोठी क्रांतिकारी योजना आहे. ही संपूर्ण योजना केंद्र सरकारची आहे. नागरिकांची नोंदणी करण्यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारला मदत करणे अशी राज्य शासनाची भूमिका आहे. राज्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाची योजना असल्यामुळे आपण केंद्र शासनास मदत करीत आहोत.

सभापती महोदय, आतापर्यंत 5 कोटी 75 लाख लोकांची नोंदणी झालेली आहे. त्यापैकी 5 कोटी 15 लाख युआयडी क्रमांक जनरेट झालेले आहेत. 4 कोटी 34 लाख आधारकार्ड डिस्पॅच झालेली आहेत. आपण सर्वजण आधारकार्ड असा शब्दप्रयोग वापरतो. परंतु आधारकार्ड अशी काही संकल्पना नाही. त्यातील क्रमांक महत्वाचा आहे. क्रमांक लक्षात राहणे अवघड आहे म्हणून आपणास पत्र देण्यात येते. त्या पत्राचे डिझाईन असे आहे की, पत्राची खालची पट्टी कापल्यावर छापलेली माहिती लॅमिनेट केली की ते कार्ड होते. खरे म्हणजे कार्डाची काहीही आवश्यकता नसून त्यातील क्रमांक महत्वाचा आहे. परंतु आधारकार्ड हा वाक्प्रचार लोकप्रिय झालेला आहे. आधार क्रमांक जनरेट झाल्यानंतर आधार यंत्रणेकडून जे पत्र दिले जाते ते महत्वाचे आहे. ते पत्र पोचले की नाही हा खरा प्रश्न आहे.

सभापती महोदय, सुरुवातीला आधार पत्र छापण्याचे काम कलकत्ता पोस्ट ऑफीसला देण्यात आले होते. त्यामुळे तेथून पत्रे येत होती. त्यानंतर हे काम मुंबईला देण्यात आले होते. मग मुंबईमध्ये या कामाचे आऊटसोर्सिंग करुन ती छापण्याची व्यवस्था करण्यात आली. या पत्राचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38305...

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

वितरण करण्याचे काम सुरुवातीला स्पीड पोस्टकडे देण्यात आले होते. त्यानंतर जानेवारी 2013 नंतर युआयडी कार्ड साध्या पोस्टाने पाठविण्यात येतात. पण त्यामध्ये काही अडचणी आल्या.

सभापती महोदय, अमरावती येथे जी घटना घडली त्यासंबंधी पोस्ट विभागाकडे विचारणा करण्यात आली असता त्यांनी सांगितले की, एका पोस्टमनकडे काही काळाकरिता आधारकार्ड वितरित करण्यासाठी देण्यात आली होती. परंतु ते काम बरेच मोठे असल्यामळे त्याने आऊटसोर्सिंग केले. तो पोस्टमन फार कल्पक निघाला. त्याने एका खाजगी माणसाला आऊटसोर्सिंग केले.

यानंतर श्री.बोर्डे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38305....

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

त्या पोस्टमनने काही आधार कार्ड टाकून दिले. अमरावती शहरात एकमेव अशी घटना घडली आहे. त्यामुळे आता 'पोस्ट' हा विषयच काढून टाकला आहे. यापुढे आधार कार्डचे पत्र प्रत्येक सेवा केंद्रात थोडीशी रक्कम भरुन छापून मिळेल. ज्या ठिकाणी नेटवर्क लिंक अप केले आहे त्या ठिकाणी आधारपत्र छापले जाईल. अमरावती शहरात आधार कार्ड टाकून दिल्याची घटना घडली ही वस्तुस्थिती आहे. ज्या पोस्टमनने हा प्रकार केला त्याच्यावर पोस्ट विभागाच्या माध्यमातून कारवाई करण्यात आली आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आधार कार्डची नोंदणी केल्यानंतर त्याच्या एसएमएसच्या प्रतिक्षेत किंवा आधारकार्डच्या प्रतिक्षेत अनेक नागरिक आहेत. नोंदणी केल्यानंतर तीन-तीन महिने संबंधितांशी कसल्याही प्रकारचे कम्युनिकेशन होत नाही. त्यामुळे राज्य सरकार या संदर्भात काय पावले उचलणार आहे ? आज आधार कार्डची लिंक अनेक शासकीय अनुदानासाठी लावली जात आहे. अनुदान द्यायचे नसेल तर आधार कार्डची मागणी केली जाते. विशेषत: आदिवासी भागात अशा प्रकारच्या घटना घडत आहेत. त्यामुळे या संदर्भात माननीय मुख्यमंत्री स्पष्टीकरण करतील काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, आधार कार्डची मूळ कल्पना थेट अनुदान देण्यासाठी होती. शासकीय सेवा किंवा अनुदान देताना जे लिकेज होत होते ते कमी करण्यासाठी आधार कार्डची संकल्पना आणली. पहिल्या टप्प्यात राज्यातील 6 जिल्हे निवडण्यात आले. त्या जिल्ह्यात आधार कार्डच्या माध्यमातून सरकारी अनुदान देण्याची योजना किंवा सेवा देण्याचे काम सुरु झाले आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आधार कार्डसाठी समान नोंदणी झाली असे नाही. महाराष्ट्रात सर्वात जास्त नोंदणी वर्धा जिल्ह्यात 88 टक्के इतकी झाली आहे. इतर जिल्ह्यात ती कमी आहे. त्यामुळेच वर्धा जिल्हा हा थेट अनुदान देण्यासाठी निवडला गेला. ज्यांना आधार कार्ड मिळालेले आहेत त्यांच्याकडून लवकरात लवकर सुविधा उपलब्ध करुन देण्याची मागणी केली जाते. त्यामुळे केंद्र सरकारने अशा सूचना दिल्या आहेत की, ज्या जिल्ह्यात आधार कार्डची किमान 80 टक्के नोंदणी झाली असेल त्याच जिल्ह्यात थेट अनुदानाची योजना कार्यान्वित होईल. त्या दृष्टीने आमचे प्रयत्न सुरु आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38305....

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात आधार कार्डसाठी सर्वात जास्त नोंदणी झाली आहे. अधिकाधिक मशीन्स घेऊन जास्तीत जास्त आधार कार्डची नोंदणी करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. त्यामुळे राज्यामध्ये जास्तीत जास्त नोंदणी होईल. राज्यात या वर्षी 100 टक्के नव्हे पण 90-95 टक्के तरी नोंदणी होईल. या कामासाठी अधिकाधिक मशीन्स घेऊन आऊट सोर्सिंगच्या माध्यमातून चांगल्या खाजगी कंपन्यांना काम देण्याची प्रक्रिया सतत सुरु आहे. मी मुद्दाम सांगू इच्छितो की, देशात महाराष्ट्र राज्यात सर्वात जास्त आधार कार्डसाठी नोंदणी झाली आहे. त्यामुळे अधिकाधिक जिल्ह्यात ही योजना विस्तारित केली आहे. सुरुवातीला शिष्यवृत्तीची योजना कार्यान्वित केली. त्यानंतर इतर सर्व योजना कार्यान्वित केल्या जातील.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. या राज्यात सरकारी आकडेवारीनुसार 25 टक्के लोकांना सुध्दा आधार कार्ड मिळालेले नाही. त्यामुळे सर्वांना आधार कार्ड कधीपर्यंत मिळणार आहेत, यासाठी काही कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे काय, तसेच या संदर्भातील पुन:आढावा घेण्याचे काम तातडीने होईल काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, या विषयातील सर्व आकडेवारी मी सांगितलेली आहे. आतापर्यंत पोस्टाच्या माध्यमातून आधार कार्डचे पत्र पोहोचण्यास विलंब लागत होता. शिवाय काही ठिकाणी अपप्रकार घडले. त्यामुळे पूर्वीची पध्दत आता बदलली आहे. नवीन पध्दतीनुसार आधार कार्ड जनरेट झाले असेल तर ते पत्र कोठेही प्रिंट करता येईल. महाराष्ट्राला जे उद्दिष्ट दिलेले आहे ते या वर्षाअखेरपर्यंत निश्चितपणे पूर्ण होईल.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता. प्र. क्र. 38305 ..... श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

थेट अनुदान देण्याची जी योजना आहे ती केंद्र शासन आपल्या सोयीप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यामध्ये किंवा राज्यामध्ये वितरित करील परंतु राज्य सरकारचे संपूर्ण सहकार्य केंद्र शासनाला मिळालेले आहे. जसजशी योजना कार्यान्वित होत आहे तसतशी त्यामध्ये सुधारणा होत आहे. प्रत्येकाला आधार कार्ड मिळेल याची मला खात्री आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, मशिन्स वाढविल्या जातील आणि अधिक वेगाने काम करण्याचा प्रयत्न केला जाईल. राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना आधार कार्ड मिळालेले नाही. आधार कार्ड दाखविल्याशिवाय त्यांना स्कॉलरशीपचा लाभ मिळणार नाही अशा पध्दतीचे आदेश आहेत. जोपर्यंत प्रत्येक विद्यार्थ्याला आधार कार्ड मिळणार नाही तोपर्यंत या सवलतीचा मुद्दा त्यामध्ये येणार नाही, या बाबतीत माननीय मुख्यमंत्री खुलासा करतील का ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, याबद्दल गैरसमज होत आहे, ही गोष्ट खरी आहे. आता स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत की, कोणालाही आधार कार्ड नाही म्हणून कोणतीही सवलत नाकारता येणार नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी जो प्रश्न विचारला त्या संदर्भातच माझा प्रश्न आहे. या अधिवेशनाच्या सुरुवातीला लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्र्यांनी यावर सविस्तर उत्तर देऊन ज्या शंका कुशंका होत्या त्याचे निवारण केले होते. त्यानंतर प्रसार माध्यमातून काही प्रकरणे पुढे आली त्यामध्ये अजूनही काही अधिकारी आधार कार्ड नसल्यामुळे तुम्हाला स्कॉलरशीप मिळणार नाही असा मुद्दा उपस्थित करीत आहेत. या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी खुलासा केलेला आहे पण मला एवढेच विचारावयाचे आहे की, आपण जो खुलासा केलेला आहे त्यासंबंधीचा जी.आर. शासनामार्फत निघालेला आहे का किंवा लवकर निघणार आहे का ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी सभागृहाला आणखी माहिती देऊ इच्छितो की, सहा जिल्ह्यांमध्ये 34 योजनांचा थेट लाभ देण्याची योजना केंद्र शासनाने घोषित केली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38305 ..... श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

त्यापैकी काही योजना, विशेषत: शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्याचे काम सहा जिल्ह्यामध्ये सुरु झालेले आहे. परंतु आधार क्रमांक असल्याशिवाय ही सुविधा मिळणार नाही असा जो गैरसमज पसरविण्यात आला होता त्या संदर्भात मुख्य सचिवांनी 6 मार्च, 2013 रोजी एक पत्र लिहून सर्व विभागांना सूचना दिलेल्या आहेत की, जोपर्यंत या सहा जिल्ह्यांव्यतिरिक्त अन्य जिल्ह्यांमध्ये 80 टक्के नोंदणी झाल्याशिवाय या योजनांचे लाभ आधार क्रमांकाशी संलग्न करण्याची घोषणा करु नये. त्याबद्दल आणखी माहिती पुरविण्यात येईल. 6 मार्च, 2013 च्या पत्राव्दारे सर्व विभागांना स्पष्टपणे कळविण्यात आले आहे.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्यांबाबत

सभापती : आज माझ्याकडे औचित्याचे पाच-सहा मुद्दे आलेले आहेत. आज माझ्या बरोबर जी चर्चा झाली त्यामध्ये ठरल्याप्रमाणे आज आलेले औचित्याचे मुद्दे आज घेण्यात येणार नाहीत. सदरहू औचित्याचे मुद्दे सोमवारी घेण्यात येतील.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

सभापती : आज माझ्याकडे सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, चंद्रकांत पाटील, डॉ. दीपक सावंत, श्री. जयंत प्र. पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस, श्री. भाई गिरकर, ॲड. अनिल परब, श्री. रामनाथ मोते, ॲड. आशिष शेलार, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार, विनायक राऊत यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. संसदीय लोकशाहीमध्ये घटना सर्वोच्च असून, राज्याचा कारभार घटनेप्रमाणे चालविण्यात येणे अशा विषयावर ही नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही या सभागृहामध्ये ज्या गोष्टी मांडतो त्यावर आम्हाला या ठिकाणी जी उत्तरे मिळतात तसेच आम्ही जे मुद्दे मांडलेले असतात ते मुद्दे उच्च न्यायालयात गेल्यानंतर त्याचे काय होते याचे मूर्तिमंत उदाहरण कालचा हायकोर्टाचा निकाल आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

सभापती महोदय, पाण्याचे समान वाटप होण्यासाठी मोहोळ तालुक्यातील बहुउद्देशीय शेतकरी संघाने उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका दाखल केली होती. सोलापूर शहराला बारा महिने पाणी मिळण्यासाठी 1980 साली उजनी धरण बांधण्यात आले आहे. हा कालावधी 12 महिन्यांवरुन आठ महिन्यांवर, त्यानंतर सहा महिन्यांवर, त्यानंतर चार महिन्यांपर्यंत येऊन पोहोचला आहे. हे पाणी कोठे जात होते ते आपल्याला माहीत आहे. या संदर्भात उच्च न्यायालयाने जलसंपदा विभागाला शपथपत्र दाखल करण्याचे आदेश दिले होते. ते शपथपत्र दाखल झाले नाही. दिनांक 6 मार्च रोजी झालेल्या सुनावणीमध्ये जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने दहा दिवसाच्या आत शेतकऱ्यांच्या समस्या ऐकाव्यात असे उच्च न्यायालयाने म्हटलेले होते. त्यानंतर दिनांक 26 मार्च रोजी उच्च न्यायालयाने असा आदेश दिला होता की, शासनाला आपले उत्तर दाखल करण्यास विभागाला आणखी कालावधी वाढून दिला जाणार नाही.

सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना मी सांगू इच्छितो की, आम्ही या सभागृहात राज्यपालांच्या अभिभाषणाच्या चर्चेच्या वेळी तसेच श्री.देशमुख यांना भेटून आल्यानंतर दुष्काळावरील चर्चेच्या वेळी जे मुद्दे मांडले होते. त्या मुद्यांबाबत शासनाकडून आम्हाला थातूरमातूर उत्तरे मिळाली आहेत. आम्ही सभागृहात मांडलेल्या मुद्यांना अनुरुप उच्च न्यायालयाने काल 24 तासाच्या आत उजनी धरणामध्ये पाणी सोडण्याचा आदेश दिलेला आहे. त्या श्री.देशमुखांच्या संदर्भात हे गतिमान व सुशासन काय म्हणाले आहे ते सर्वांनाच माहीत आहे.

या विधिमंडळाला एक महत्व आहे. विधिमंडळामध्ये उपस्थित करण्यात आलेल्या विविध प्रश्नांसंबंधीचे मुद्दे शासन मान्य करीत नाही. परंतु त्याच गोष्टी कोर्टाकडून मान्य करुन घ्यावयाच्या असतील तर विधिमंडळातील आमच्या सहभागाचा व आमच्या भूमिकेचा एक प्रकारे अवमानही होत असतो. आम्ही सभागृहात जे मुद्दे मांडले होते ते वेगळे होते का ? आमचे म्हणणे हायकोर्टाला पटले आहे. परंतु सरकारला ते पटत नाही, कारण सरकारकडे बहुमत आहे म्हणून आपल्या डायनॅमिक कंपनीला शेतीचे पाणी पाठविण्याच्या उद्देशाने हे सर्व केले होते का ? दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्यांना न्याय न देता उद्योगधंद्याच्या बाजूने शासन निर्णय घेत आहे. हायकोर्टाने या संदर्भात निर्णय दिलेला आहे.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

त्यानुषंगाने सभागृहात सविस्तर चर्चा होण्यासाठी सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजूला ठेवले पाहिजे. चर्चेच्या अनुषंगाने जे मुद्दे येतील त्यातील कोणते मुद्दे योग्य, अयोग्य आहेत हे सरकारलाही सांगण्याची संधी आहे. सामान्य माणसांच्या भावना आम्ही येथे मांडत असतो. त्या अनुषंगाने सरकारकडून योग्य उत्तरे येत नाहीत. सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयी चर्चा केली पाहिजे असे आम्हाला वाटत असल्यामुळे आम्ही नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेचा आग्रह धरत आहोत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उजनी धरणासंबंधी आपली भूमिका मांडलेली आहे. काल हायकोर्टाने निर्णय देऊन सरकारला चपराक लगावली आहे. या सरकारमधील तत्कालीन माननीय जलसंपदा मंत्री, या सभागृहाचे नेते आणि विद्यमान माननीय अर्थ मंत्री श्री.अजित पवार यांनी जे काही वक्तव्य केले होते त्याच्या विरोधामध्ये काल उच्च न्यायालयाने चपराक लगावलेली आहे.

(सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आता माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी ताबडतोब राजीनामा दिला पाहिजे.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, माझ्याकडे नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्यातील विषय या नियमामध्ये कसा बसतो एवढ्या मर्यादेतच आपण आपले वक्तव्य करावे. आपण भाष्य करीत असताना कोणाचेही नाव घेण्याचे टाळावे.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

सभागृहात गोंधळाचे वातावरण असल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.19 ते 1.34 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

निंदाव्यंजक प्रस्तावाबाबत

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने एक महत्वाचा विषय येथे मांडत आहे.

"राज्यात निर्माण झालेली भीषण दुष्काळी परिस्थिती, राज्यातील 12000 गावे दुष्काळाच्या छायेत असणे, सध्या 1205 गावातील 3789 वाड्यांना 2000 पेक्षा जास्त टँकरद्वारा पाणी पुरवठा करण्यात येणे, शासन अथक परिश्रम करुन दुष्काळाचा मुकाबला करीत असताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष मा. श्री. राज ठाकरे यांनी राज्यात विविध ठिकाणी झालेल्या सभेत दुष्काळी भागातील महिला व तरुणी या वेश्या व्यवसाय करीत आहेत असा गंभीर आरोप करणे,

नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.हेमंत टकले.....

यामुळे दुष्काळी भागातील महिला व तरुणींबद्दल सर्वांकडे गैरसमज पसरणे व संशयाचे वातावरण निर्माण होणे, सावित्रीबाई फुले, बहिणाबाईंचा वारसा लाभलेल्या राज्यातील महिला व तरुणींबद्दल असा बिनबुडाचा आरोप करुन समस्त स्त्री जातीचा केलेला अवमान, त्यामुळे राज्यातील सर्व महिला वर्गात पसरलेला तीव्र संताप, याबाबत सखोल चौकशी करुन श्री.राज ठाकरे यांचेवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी यावर शासनाने करावयाची कार्यवाही."

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सभागृहातील परिस्थिती लक्षात घेता मी सभागृहाची बैठक दिवसभरासाठी तहकूब करीत आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 15 एप्रिल, 2013 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक होईल. या विशेष बैठकीमध्ये सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 या वेळेत प्रलंबित व नियमित लक्षवेधी सूचना तसेच महाराष्ट्र विधानपरिषद नियम 93 अन्वये सूचनांवरील निवेदने घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 01 वाजून 36 मिनिटांनी सोमवार, दिनांक 15 एप्रिल, 2013 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही